आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ८ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 8 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-267 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# कोल्हापुरात परिस्थिती नियंत्रणात

## फौजफाट्यासह आयजी सुनील फुलारी रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनी लावण्यात आलेल्या आक्षेपार्ह स्टेटसमुळे बुधवारी हिंदुत्ववादी संघटनेने पुकारलेला बंद आणि केलेल्या ठिय्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. आक्षेपार्ह स्टेट्स आणि कोल्हापूर शहरात व्हायरल मेसेजवरुन परिस्थितीचा अंदाज असतानाही पोलीस यंत्रणेला हिंसक जमावाला पांगवण्यासाठी तब्बल अडीच तास झुंजावे लागले. कोल्हापूर पोलिसांच्या फौजफाट्यासह कोल्हापूर परिक्षेत्राचे आयजी सुनील फुलारी यांनाही रस्त्यावर उतरावे लागले. दुपारनंतर शहरातील परिस्थिती नियंत्रणात आल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.**

आक्षेपार्ह स्टेटस ठेवणाऱ्यांपैकी सहा जणांना अटक करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. मात्र, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित आणि विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी कोणताही आकडा सांगितला नाही. आक्षेपार्ह व्हॉट्सॲप स्टेटस व्हायरल झाल्यानंतर कोल्हापुरात संतप्त पडसाद उमटले होते. यानंतर हिंदुत्ववादी संघटनांनी बंदी आदेश झुगारुन बुधवारी आंदोलनाची घोषणा केली होती. सकाळपासून शिवाजी चौकात हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांसह तरुण जमण्यास सुरुवात झाली. पाहता पाहता शिवाजी चौकात मोठी गर्दी झाली. यावेळी पोलीस प्रशासनाकडून ठिय्या आंदोलन जितक्या वेळ हवं तितकं करता येईल, पण मोर्चाला परवानगी दिली जाणार नाही, अशी भूमिका घेण्यात आली. दरम्यान पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच बाचाबाची झाली. कार्यकर्ते मोर्चा काढण्यावर ठाम होते. मोर्चावरुन दोन गट झाल्याचेही दिसून आले. त्यामुळे काहीकाळ गोंधळ उडाला होता.

**तर गय केली जाणार नाही : रेखावार**

शहरातील संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात आहे. कोल्हापूरात शांतता राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त देण्यात येत आहे. त्यामुळे सर्वांनी निश्चिंत रहावे. नागरिकांनी सोशल मिडियाव्दारे पसरणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. शहरातील आणि जिल्ह्यातील शांतता अबाधित राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केले आहे. शाहू महाराजांचे कार्य कर्तृत्व आणि त्यांच्या विचारसरणीतून प्रेरणा घेवून आजवर कोल्हापूर जिल्ह्याने जगाला पुरोगामी आणि आधुनिकतेचा विचार दिला आहे. जगाला आदर्श विचार देणारा हा संपूर्ण जिल्हा आहे. सामाजिक क्षेत्रातील ठसा कायम राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा, असे आवाहन करुन प्रशासनाने दिलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे सर्वांनी तंतोतंत पालन करावे, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीची गय केली जाणार नाही.

**अफवांना बळी पडू नये : सुनील फुलारी**

सोशल मिडियावरील अफवांना नागरिकांनी बळी पडू नये. तसेच अनावश्यक घराबाहेर पडून गर्दीत भर घालू नये, असे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी केले आहे. कोल्हापूरमधील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. परिस्थितीचा फायदा घेवून लोकांना घाबरवणाऱ्या व दंगा घडवून आणणाऱ्या गुंडांना शोधण्यात येत असून त्यांना अटक करण्याची कारवाई सुरु राहणार आहे. झालेल्या नुकसानीची दखल घेवून दोषींवर गुन्हा दाखल करण्यात येईल. सध्या स्थानिक प्रशासनाकडून निर्गमित केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे सर्वांनी पालन करावे. पोलीस प्रशासनाच्या वतीने नागरिकांना संरक्षण देण्यास पूर्णत: कटिबद्ध असून कोणतीही अडचण आल्यास स्थानिक पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन अथवा पोलीस प्रशासनाशी नागरिकांनी संपर्क करावा, असे आवाहन फुलारी यांनी केले आहे.

### चर्चेतली बातमी

## रेडीएट कंपनी करणार कर्मचाऱ्यांची कपात

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** सध्या जगभरामध्ये अनेक जागतिक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांची कपात करत आहेत. जागतिक आर्थिक मंदीचे कारण देत ही कर्मचारी कपात करण्यात येत आहे. आता पर्यंत मेटा, टिव्टर, अमेझॉनसह अनेक कंपन्यांनी कपात केली आहे. आता रेडीएट या कंपनीने देखील कर्मचारी कपात केली आहे. सोशल प्लॅटफॉर्म असणाऱ्या रेडीएट कंपनीने आपल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५ टक्के म्हणजे ९० कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. यामुळे आता अमेरिकेतील कर्मचाऱ्यांची कपात करणाऱ्या कंपन्यांच्या यादीमध्ये रेडीएटचा समावेश झाला आहे. मेटा प्लॅटफॉर्मसह अनेक टेक कंपन्या महामारीच्या काळामध्ये नोकरीवर घेतल्यावर आता नोकऱ्यांची कपात करत आहेत. कारण आर्थिक मंदीचा सामना करण्याचा त्या प्रयत्न करत आहेत. २०११ मध्ये कॉन्डे नास्ट या मासिकामधून वेगळे करण्यात आले होते. सध्याच्या काळामध्ये रेडीएटला वॉलस्ट्रीटबेट्स आणि त्याच्या प्लॅटफॉर्मवरील इतर ठिकाणी लोकप्रियतेत वाढ झाली. जे किरकोळ गुंतवणूकदारांसाठी स्टॉकवर सट्टा लावण्याचे ठिकाण बनले आहे. कंपनीचे सीईओ स्टीव्ह हफमन यांनी कर्मचारी कपातीबद्दल कर्मचाऱ्यांना केलेल्या ईमेलचा दाखला देत रेडीएटच्या या निर्णयाची माहिती दिली.

## ही सरकारला शरमेने मान खाली घालावी लागणारी घटना : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईत वसतीगृहात मुलीवर अत्याचार होतो ही सरकारला शरमेने मान खाली घालावी लागणारी घटना आहे, अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

मुंबईत वसतीगृहात मुलीवर झालेल्या अत्याचार व हत्येनंतर आज विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानभवन परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना सरकारला धारेवर धरले. याबद्दल सरकार कठोर भूमिका का घेत नाही असा सवालही अजित पवार यांनी मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्री यांना केला आहे. मुंबईतच नव्हे तर राज्याच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात मुलींना, मुलांना, महिलांना सुरक्षित वाटले पाहिजे. मात्र असे घडताना दिसत नाही. याला पोलीस आणि सरकार जबाबदार आहे असा थेट आरोपही अजित पवार यांनी केला.

वसतीगृहात वास्तविक त्या नराधमाला सुरक्षारक्षक म्हणून कसे नेमण्यात आले. यामध्ये वस्तुस्थिती काय आहे, कितीजणांनी हे कृत्य केले आहे. याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी करतानाच अजित पवार यांनी मुलींच्या किंवा महिलांच्या सुरक्षिततेबाबत निष्काळजी राहणाऱ्या सरकारचा जाहीर निषेध केला. ही झालेली घटना लक्षात घेऊन राज्यात जिथे- जिथे वसतीगृह आहेत तिथे सुरक्षेची व्यवस्था नीट आहे का याची माहिती घ्यावी. या घटनेचा तपास ज्यांच्याकडे आहे त्यांनी ताबडतोब खोलवर जाऊन कोण जबाबदार आहे याचा छडा लावला पाहिजे, अशी मागणीही अजित पवार यांनी केली. आज कोल्हापूर बंद आहे. कोल्हापूरमध्ये कायदा व सुव्यवस्था अडचणीत आणण्याच्या काही घटना जाणीवपूर्वक करण्यात आल्या त्याआधी सुध्दा वेगवेगळ्या भागात दंगली घडवून आणण्यासारखे प्रकार होत आहेत त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अडचणीत येत आहे. येणाऱ्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून आपल्या पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था अडचणीत आणून समाजासमाजामध्ये अंतर पाडण्याचे काम किंवा द्वेष निर्माण करण्याचे काम काही शक्ती जाणीवपूर्वक करत आहेत का ? त्यातून त्यांना वेगळा स्वार्थ साधायचा आहे का असा थेट सवाल अजित पवार यांनी केला.

## गृहमंत्री फडणवीसांचा राजीनामा घ्या

### पटोले : औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे आत्ताच बिळातून बाहेर कसे आले ?

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाराष्ट्रात कटकारस्थान करुन सत्तेत आलेले शिंदे फडणवीस सरकार कायदा सुव्यवस्था राखण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून पोलीस कारवाई करण्यात अपयशी ठरत आहेत. फडणवीस गृहमंत्री असतानाच धर्मांध शक्तींना प्रोत्साहन कसे मिळत आहे ? राज्यात दंगली घडवण्याचा पहिला प्रयत्न मागील महिन्यात फसल्यानंतर आता पुन्हा औरंगजेबाचा मुद्दा पुढे करून वातावरण अशांत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचसोबत मुंबईसारख्या सुरक्षित शहरामध्ये एका विद्यार्थीनीची वसतीगृहात अत्याचार करून हत्या केल्याचे समोर आले आहे. राज्यात पोलिसांचे नाही तर समाजकंटकाचे आणि गुन्हेगाराचे राज्य आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांचे गृहखात्यावर आणि पोलिसांवर नियंत्रण राहिलेले नाही त्यामुळे मुख्यमंत्री शिंदेंनी त्यांचा राजीनामा घेऊन सक्षम गृहमंत्री नेमावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा पंचनामा करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, या सरकारच्या काळात औरंगजेबाचे उदात्तीकरण सुरु आहे. औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे आत्ताच बिळातून बाहेर कसे आले ? राज्यात रोज दंगली सुरु आहेत. मुख्यमंत्री व गृहमंत्री काय करत आहेत ? शिंदे फडणवीस सरकार नपुंसक आहे असे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते ते खरेच आहे. संभाजीनगर, अहमदनगर, शेवगाव, अमरावती, नाशिकमध्ये धार्मिक मुद्द्यांना हवा देऊन राज्यात दंगली घडवण्याचा प्रयत्न मागील महिन्यात झाला पण लोकांनी सामंजस्याची भूमिका घेतल्याने तो प्रयत्न फसला. आता पुन्हा धर्मांध शक्ती अहमदनगर व कोल्हापूर जिल्ह्यात औरंगजेबाचा मुद्दा पुढे करुन वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यात धार्मिक मुद्द्यांना हवा देऊन दंगली भडकावून आपली राजकीय पोळी भाजपाचा कुटील डाव आहे.

**मुंबईत महिला मुली सुरक्षित नाहीत :** मुंबईतील चर्चगेट येथील हॉस्टेलमध्ये एका महाविद्यालयीन तरुणीची हत्या केल्याचे उघड झाले आहे, तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे दिसत आहे. मंत्रालय आणि मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असणा-या मलबार हिलपासून हाकेच्या अंतरावर असणा-या वसतीगृहात दिवसाढवळ्या एका विद्यार्थीनीवर अत्याचार करून तीची हत्या केली जाते ही महाराष्ट्राला लाज आणणारी बाब आहे. मात्र सत्तेवर बसलेल्या लोकांना याचे काहीच वाटत नाही, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. मुंबई सारख्या शहरातच मुली सुरक्षित नाहीत. राज्यातून हजारो महिला आणि मुली बेपत्ता होत आहेत आणि सरकार मात्र झोपलेले आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## व्यवसाय बंद करून केली आश्रमाची स्थापना


### गोलटगाव येथे दोन एकरात साकारात आहे सरस्वती दृष्टी फाउंडेशनची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती संभाजीनगर : सिंदखेडराजा येथील व्यावसायिक रविंद्र देशपांडे यांनी त्यांचा हार्डवेअर, फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्सचा सुरळीत व उत्तमरीत्या सुरू असणारा व्यवसाय पूर्णपणे बंद करून छत्रपती संभाजीनगर मधील गोलटगाव येथे नैसर्गिक वातावरणात 2 एकर परिसरात सरस्वती दृष्टी फाउंडेशन नामक आश्रमाची स्थापना केली. 15-20 वर्षांपूर्वी संभाजीनगर येथे देशपांडे यांचा हार्ड वेअरचा खूप मोठा व्यवसाय होता. त्यांची शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी वर्गामध्ये नोंद घेतली जात असे. कोणताही व्यापारी हा आपला व्यापार वाढवत तो सदैव उच्च पातळीवर नेण्याचा नेहमी प्रयत्न करत असतो, पण काही व्यक्ती मात्र यास अपवाद ठरतात हे आपल्याला देशपांडे यांच्या उदाहरणावरून दिसून येते. विशेष म्हणजे या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी सौ. मीरा देशपांडे यांची देखील मोठी साथ लाभली आहे. सध्या या आश्रमाचे काम पूर्णत्वास नेण्याची तयारी सुरू असून गेल्या काही महिन्यांपासून देशपांडे दांपत्य हे स्वतः आपले निवासस्थान सोडून येथेच राहत आहेत. या आश्रमाचा मुख्य भर हा सरस्वती देवी मंदिर व बाल संस्कार केंद्र, वृद्धश्रम यावर असून यात त्यांनी विविध उपक्रमांची देखील रचना केली




आहे. या आश्रमाचे खास वैशष्टय म्हणजे येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस येथील प्रसन्न वातावरण अनुभवून विरंगुळा म्हणून येथेच काही दिवस राहण्याचा मोह आवारत नाही अशी माहिती देशपांडे यांनी दिली. वयाच्या ६० व्या वर्षानंतर कोणीही व्यक्ती आयुष्यभर स्वीकारलेल्या कामातून, नोकरीतून अथवा व्यवसायातून निवृत्ती घेऊन उरलेले आयुष्य हे आता आरामात व निवांतपणे जगण्याची इच्छा बाळगते. पण अशातच वयाच्या ६३ व्या वर्षी देशपांडे यांनी आपला व्यवसाय बंद करून त्यातील उत्पन्नात तसेच यातही कमतरता भासल्याने आपल्या स्वतः च्या इमारतीवर कर्ज काढून आश्रम उभा करण्याचा जो दृढ निश्चय स्वीकारला हा अभिमानास्पद आहे. मुळात केवळ निवांतपनामुळे व कामात नसल्यामुळेच साठीच्या नंतर विविध आजारांचा व निरशपणाचा सामना करून उर्वरित आयुष्य आहे तसे हतबल होऊन जगावे लागते व याउलट जर याच वयात कामात राहिल्याने, नैसर्गिक वातावरणाच्या सहवासात असल्याने आयुष्य किमान १० वर्षांनी वाढून उर्वरित आयुष्य हे सुखी, समाधानी, आनंदात व सन्मानाने जगता येते असे देशपांडे यांचे मत आहे. तसेच हा आश्रम निर्माण झाल्यानंतर देखील आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत किमान असे ११ आश्रम निर्माण करण्याचा विडा देशपांडे यांनी स्वीकारला आहे व हेच कार्य पुढे नेण्याचे विचार त्यांनी त्यांच्या मुलींना व मुलाला दिले. श्री व सौ देशपांडे यांचे विचार व प्रत्यक्षातील कार्य हे एकविसाव्या शतकात एक आदर्शवादी छत्र म्हणून समाजास साऊली देण्याच्या हेतूने आधारस्तंभ आहेत.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

श्रावण वद्य अष्टमी. दोन महापुरुषांचा जन्मदिवस. योगेश्वर श्रीकृष्ण आणि संत ज्ञानेश्वर. दोघेही लोकोत्तर महापुरुष. श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त बनवून गीता सांगितली ती सगळ्या जगासाठी. तीच गीता सर्वसामान्य माणसाला समजावी म्हणून गीतेचा अमृतकलश ज्ञानेश्वर माउलींनी मराठीत आणला. एकाच दिवशी या दोन महात्म्यांची जयंती हा निश्चितच काहीतरी ईश्वरी संकेत असला पाहिजे. ' ज्ञानियांचा राजा ' म्हटलं की आमच्या डोळ्यांसमोर ज्ञानेश्वर माउली येतात. पण ज्ञानेश्वर माउली काय योगेश्वर श्रीकृष्ण काय, दोघेही तसे ज्ञानियांचे राजेच ! सगळ्या राजांचे राजे. तत्वज्ञानांचे तत्वज्ञानी. दोघेही विश्वगुरु ! माउलींनी एवढ्या सुंदर पद्धतीने गीतेचे निरूपण केले की त्यांच्याच शब्दात सांगायचे तर ' माझा मराठीचा बोलू कवतुकें, परी अमृतातेही पैजा जिंके ' असेच ते आहे. केवळ गीता किंवा ज्ञानेश्वरीच नाही तर मराठी भाषेलाही ज्यांनी गौरव प्राप्त करून दिला अशी माझी ज्ञानेश्वर माउली. म्हणून तर एक तरी ओवी अनुभवावी एवढे महत्व माऊलींच्या शब्दांना प्राप्त झाले आहे.
युगानुयुगे आणि शतकानुशतके भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी या दोन्ही ग्रंथांचे भाविक, कवी, विद्वान आणि सर्वसामान्य जन आकंठ रसपान करीत आले आहेत. अनेकांना ते नित्य नवी प्रेरणा देत आले आहेत. व्यवहार आणि अध्यात्म या दोन्हीमध्ये पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे या ग्रंथातून नक्कीच मिळतात एवढी त्यांची थोरवी आहे.
ज्ञानेश्वर माउलींनी संत निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून ज्ञानेश्वरी सांगितली. निवृत्तीनाथ हे त्यांचे केवळ ज्येष्ठ बंधूच नव्हते तर गुरूदेखील होते. ज्ञानेश्वरी सांगण्याचं कोणतंही श्रेय माउली स्वतःकडे घेत नाहीत. त्याचं कर्तृत्व, मोठेपणा ते आपल्या गुरूंकडे सोपवतात. केवढी ही नम्रता ! प्रत्येक लहानसहान गोष्टीचं श्रेय घेण्याची आपली प्रवृत्ती. त्यातून आपला अहंकार नकळत पोसला जातो. माउलींनी गीतेवरील भाष्य म्हणून नऊ हजार ओव्या लिहिल्या. आणि शेवटच्या नऊ ओळीत मागणे मागितले. विश्वात्मक देवाकडे. मी एवढा वाकयज्ञ केला आहे.



## आनंदी पहाट

## पैशाप्रमाणे वेळ साठवून ठेवता येत नाही

आधुनिक केसरी

आपल्या सर्वांना सारखेच एका दिवसाचे चोवीस तास मिळतात. काही लोक इतरांपेक्षा त्यांच्या उपलब्द वेळेत अधिक साध्य करत असतात. वेळेचे चांगले, योग्य व्यवस्थापन हेच त्यामागचे मुख्य कारण असते. टाइम मॅनेजमेंट म्हणजे तुमचा वेळ वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटींमध्ये कसा विभागायचा याचे आयोजन आणि नियोजन करण्याची प्रक्रिया आहे. त्याचे ज्ञान पल्याला बरोबर मिळवावे लागते आणि कमी वेळेत अधिक काम करण्यासाठी आपण अधिक हुशारीने काम करणे कठीण नसते. वेळ कमी असताना आणि दबाव जास्त असतानाही आपण करत असलेल्या कामात यश प्राप्त होऊ शकते. सर्वोच्च यश मिळविणारे त्यांचा वेळ अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करतात. मनाच्या उच्च साधनेच्या वेळेच्या व्यवस्थापन संसाधनांचा वापर करून, आपण देखील आपल्या वेळेचा पुरेपूर उपयोग करू शकतो. आपला वेळ प्रभावीपणे कसा व्यवस्थापित करायचा हे आपल्याला माहिती करून घेणे आवश्यक असते. त्याचे अनेक फायदे आपल्याला प्राप्त होऊ शकतात. एकंदरीत, तुमचा वेळ सर्वोत्तम कसा वापरायचा हे निवडण्याच्या पद्धतीमुळे आत्मविश्वासाने आपण अधिक नियंत्रणात राहू शकतो आणि सर्वोच्च यश संपादित करू शकतो. आपल्यामध्ये अधिक आनंदी, आरामशीर राहून देखील सखोल विचार करण्याची क्षमता असल्याने आपण अधिक सक्षम होऊ शकतो. इतरांना त्यांच्यालक्ष्यांपर्यंत पोहोचण्यास मदत करण्यासाठी आपणा उत्तम मार्गदर्शक ठरू शकतो. आपल्या मनःशक्तीमध्ये एकूणच वेळ व्यवस्थापन सुधारण्यासाठी डिझाइन केलेली, परिपक्वता असलेली संसाधने आणि मनाची प्रगल्भता असते. सामान्य वेळ-व्यवस्थापन आव्हानांसाठी व्यावहारिक उपाय देतात, तसेच मुख्य सवयी अधिक चांगल्यासाठी आपले विचार, वर्तन आणि व्यवहार बदलण्याचे योग्य मार्ग दाखवतात. आपण अधिक संघटितपणे कार्य करू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**खेळवित बसे | विश्व सारे ||**

काळाची गती | अखंड चालते ||
मागे रेंगाळते | बालपण ||१||
निरंतर राहो | निरागस मन ||
माऊलीचे ध्यान | ढळू नये ||२||
विकारांचा संग | स्पर्षु नये जीवा ||
तुकोबाच व्हावा | जीवलग ||३||
नांदो बाळकृष्ण | ज्ञानवंता घरी ||
अर्जुन अंतरी | सुखी होतो ||४||
त्रैलोक्याचा धनी | बालमनी वसे ||
खेळवीत बसे | विश्व सारे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


पठतो नास्ति मूर्खत्वं जपतो नास्ति पातकम् ।मौनिनः कलहो नास्ति न भयं चास्ति जाग्रतः॥स्पष्टीकरण - मूर्खपणा किंवा अज्ञान घालविण्यासाठी अभ्यास आवश्यक आहे. मुलांनो ! एवढे जरी तुम्ही लक्षात ठेवलेत, तरी पुष्कळ आहे. विद्या ही अभ्यासाच्या मागून येणारी वस्तू आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


जिवन्मुक्त के कर्म जग,
सो अकर्म कर जान । कर्म करे फिर नहिं करे, कर्म भोग नहिं मान ।।६२।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय) ०५/१२/६२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जीवन्मुक्त योगीयांद्वारा (जिवंतपणीच मुक्त झालेले, या शरीरात राहून प्रभु प्राप्ती करून मुक्त झालेले) या जगात केले गेलेले सर्व कर्म अकर्म आहेत. ते कर्म करूनही करत नाहीत आणि त्यांना कर्मभोगही असत नाही. ते सर्व कर्मांमध्ये असंग होऊन जगाच्या कल्याणासाठी कर्म करतात. ते कर्माच्या दलदलीत फसत नाहीत. हीच जीवन्मुक्त योग्याची ओळख आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प ३०वे

आधुनिक केसरी

श्रीमहाराजांची परीक्षा घेण्याचे ठरवूनी इनामदार पत्नी जिजीबाई
बागेत गेली समोर त्यांच्या लाल तिखटाचे लाडू ठेवले
त्यांनी हसत हसत सारे खाऊन टाकले ।।१ ।।
जिजीला म्हणाले, माय, अजून हवेत मला
ती म्हणे, आता संपले, उद्या आणते खायला
मनाशी बोले जिजी, बुवांनी लाडू तर खाल्ले
जळते निखारे, बघु कसे जमते खायाला ।।२ ।।
बागेत आलेल्या जिजीने गप्पा छान केल्या
म्हणाली- बुवा, आणलाय पदार्थ खायला
जळत्या निखाऱ्याची परात समोर ठेवली खाऊन
ते बोलले - माय,बरे लागले की हे ।।३ ।।दे आणखी थोडे," म्हणत
हात पुढे केला ऐकुनी शब्द हे, जिजी मनोमन वरमली सिद्धपुरुषाचे
पाय धरीत जिजी म्हणाली क्षमा करावी मला, बाप आहेत माझे
तुम्ही ।।४ ।।माय, अशी परीक्षा नाही घेऊ कधी कुणाची संतांची
घेणे परीक्षा रीत ही नाही कधी बरी म्हणे- अरुणदास , महाराज
सांगती जे जे गोष्ट असते आपल्या हितासाठीची हो खरी ।।५ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी


मित्रद्रोही कृतघ्नश्च तथा विश्वासघातकः । यस्ते नरकं यान्ति यावचन्द्रदिवाकरौ ॥ स्पष्टीकरण - ही तीन पातके धार्मिक नसून नैतिक आहेत. ज्याला एकदा मित्र म्हटले, त्याचे वाकडे करण्याची इच्छा सुद्धा मनात येता कामा नये. कोणी आपल्यावर उपकार केले असल्यास जन्मभर त्यांचे स्मरण ठेवावे. आधी कोणाला वचन देऊ नये; पण दिले असल्यास ते पाळायलाच हवे. नाही तर तो दुसरा माणूस अडचणीत सापडेल. कोणत्याही माणसाने ही तीन नैतिक तत्त्वे पाळलीच पाहिजेत.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

## आनंद मिळविण्यासाठी वासना भगवंताकडे वळवावी.

आधुनिक केसरी

घरामधे कसे हसूनखेळून मजेत असावे. आपली वृत्ती अशी असावी की, ज्याला आनंद पाहिजे असेल त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ति कितीही दिली तरी पुरे पडत नाही. पण वृत्तीचा आनंद देऊन कधी संपत नाही. जीवन हे मूलतः आनंदमय आहे; सृष्टिक्रमावर सोडले तर ते सुखी होईल. आनंद अत्यंत विशाल आहे. देहबुद्धी मेली म्हणजेच त्याची प्राप्ती होत असते. आनंद मिळविणे हे सोपे आहे. पण हे समजून, आपण सोपे झाले पाहिजे. आपण उपाधीने जड झालो आहोत, म्हणून आपण हलके झाले पाहिजे. सर्व जगाला आनंद हवा असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत आनंद राखावा. आनंद हा शाश्वत आहे. पण आपण विषयातच आनंद मानतो, त्यामुळे खरा शाश्वत आनंद आपल्याला मिळत नाही. फोड आला म्हणजे खाज सुटते, आणि खाजवल्यावर रक्त आले तरी एक प्रकारचा आनंद आपल्याला होत असतो. पण म्हणून खाजवतच राहणे योग्य होईल का ? कुत्र्याच्या तोंडात हाड असताना, स्वतःच्या तोंडातले रक्तच तो चघळत असतो. त्यातले



काही रक्त जमिनीवर पडून कमीही होत असते. परंतु तो हाडूक काही सोडीत नाही. विषयाचा आनंद हा असाच असतो. कोणतीही वस्तु अस्तित्वात नसतानाही होणारा आनंद, ते परमात्म्याचे व्यक्त स्वरूप आहे. वासना भगवंताकडे वळविली की मग आनंदाशिवाय दुसरा कोणता लाभ होणार ? खरोखर, वासना ही विस्तवासारखी आहे. ज्या विस्तवाने सुंदर स्वयंपाक करून कढत आणि ताजे अन्न खायला मिळते, तोच विस्तव जर घरावर ठेवला, तर घर जाळून टाकतो. त्याप्रमाणे वासना भगवंताकडे वळली तर माणसाला आनंदरूप बनविते; पण ती जर विषयाकडे वळली तर त्याला दुःखामध्ये लोटते. वासना रोज नवीन नवीन खेळ आपल्याला दाखविते. म्हणजे खेळ जुनेच असतात, पण आपली वासना मात्र नवी असते. वासना म्हणजे अभिमान किंवा मीपणा, हा मनुष्याचा शत्रु असून तो त्याच्या आनंदावर विरजण घालतो. वासनेमुळे चित्ताला समाधान नाही हे कळत असूनसुद्धा, वासनेचा जोर इतका विलक्षण असतो की तो शेवटच्या श्वासापर्यंत जात नाही. ज्याने वासनेला जिंकले, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली म्हणून समजावे. वासनेला जिंकायला भगवंताच्या नामात राहण्यासारखा दुसरा उपाय नाही. वासना न ठेवता कर्म करणे याचेच नाव संन्यास. जिथे वासना संपली तिथे आनंदच आहे. चिरकाल टिकणारा आनंद हा वस्तुरहित असतो.



**अत्याचार, आक्रमक आंदोलन आणि न्याय**

पान 4

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ८ जून २०२३



**नवी इमारत, जुनेच वांधे**

पान ४


# शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे!

## लाचखोरांना आवरा हो..आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या सडेतोड प्रतिक्रिया

आधुनिक केसरी जनचर्चा

आधुनिक केसरी

**औरंगाबाद :** शिक्षण हे पवित्र क्षेत्र भ्रष्टाचाराने बरबटून गेले आहे. यातील अनेक कारनामे बघितल्यावर अंगावर काटे उभे राहतात. नुकतेच महाराष्ट्राच्या शिक्षण विभागातील त्या 40 लाचखोर अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खुली चौकशी करावी असे पत्र राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिल्यानंतर खळबळ उडाली आहे. ही चौकशी निष्पक्षपणे केल्यास त्यातून अनेक महत्त्वपूर्ण कारनामे वरपासून खालपर्यंत उजेडात येतील. आता शिक्षण विभागात याची थिनगी पडली आहे. ती थिनगी इतर विभागात देखील पोहोचली तर लाचखोरीचा भस्मासुर आपोआप बाहेर निघेल. परंतु हे करण्यासाठी इच्छाशक्ती आणि प्रबोधन होणे गरजेचे आहे. याविषयी आधुनिक केसरीस जनचर्चेत वाचकांनी सडेतोड भाष्य केले.

### लाचखोर अधिका-यांना, कार्यालयांना अभय मंञ्यांचे की राजकारण्यांचे ?



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आज देश चालवणारेच भ्रष्ट झाले आहेत. राजकीय यंत्रणाही कुचकामी झाली आहे. मग त्यांच्या हातात असणा-या विविध क्षेत्राला ते कलंकित का करू शकणार नाहीत ? मुळात कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षक यांची भरती प्रक्रिया हीच भ्रष्टाचारी आहे. यामध्ये कार्य करणारे कार्यालयाची यंत्रणा, अधिकारी मग ती शासकीय असो की विद्यापीठीय ही भ्रष्टाचाराने खचाखच भरलेली आहे.माणसांच्या मुंड्या पिरगळणारी ही अवलाद आहे. मेलेल्या मड्यावरील टाळूवरचं लोणी खाणारी हि गिधाडं आहेत. या शैक्षणिक खात्यातच विषमता प्रचंड मोठ्या प्रमाणावर आहे. गुणवत्ता असुनही मान्यता मिळवण्यासाठी, पगार यादीत नाव येण्यासाठी, पदोन्नतीसाठी लाखो रुपये खर्चावे लागतात. हे अधिकारी गुणवत्तेला अजिबात वाव देताना दिसत नाहीत. शिक्षण घेतलेली ही शिक्षक आणि प्राध्यापक ही मंडळीही हे शोषण सहन करते आहे.तेही षंढ झाल्याप्रमाणे वागताना दिसत आहेत. त्यांनी या विरोधात आवाज उठवायलाच हवा. परंतु प्रत्येक जण स्वार्थात प्रचंड बरवटलेला दिसतो आहे. म्हणून ह्या अशा अधिका-यांना माज चढल्यासारखे वागत आहेत. विद्यापीठातही कुलगुरू महोदय ज्या विविध कमिट्या निर्माण करतात त्या कमिट्यावरही गुणवत्ताहीन माणसे दिसून येतात. त्यांच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा दर्जा दिसून येत नाही. केवळ ती जवळची, आप्तामधली, जातीमधील, नातेवाईक किंवा सत्ताधारी पक्षाशी निगडित आहेत म्हणून त्यांना निवडले जाते. खऱ्या गुणवत्ताधारकांना ते चांगल्या चांगल्या कमिटीवर जाणून बुजून घेतच नाहीत. त्यांना कुठेही संधी दिली जात नाही. अशी ही माणसे सगळ्याच पातळीवर निकृष्ट आणि दर्जाहीन कामे करताना दिसतात. हीच माणसे गुणवत्ता नसणाऱ्यांना किंवा पात्रता नसणा-यांना विविध पदावर बसवताना दिसतात. त्यांनाच मोठे करतात. मग नॅक कमिटीही त्याला कशी अपवाद असू शकणार ?तीही भ्रष्टाचारी आहे असे मागे दिलेल्या अध्यक्षांच्या राजीनामावरून दिसून येते. शाळां तपासणी असेल, विद्यापीठाची कमिटी असेल किंवा नॅक कमिटी कधीही शाळेची महाविद्यालयाची बारकाईने तपासणी करताना दिसत नाही. सोयी,सुविधा, विद्यार्थ्यांचे,प्राध्यापकांचे प्रश्न जाणूनही घेत नाही. महाविद्यालय विद्यार्थ्यांवर, प्राध्यापकावर अन्याय करून त्यांना विविध सोयी सुविधेपासून, पदोन्नती पासून वंचित ठेवते की नाही किंवा पदोन्नती ( कॅश )वेळी शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडून होत असणारा आर्थिक व्यवहार याविषयीही बिलकुल चौकशी करत नाही. अनेक दर्जाहीन महाविद्यालय ए ग्रेड मिळवताना दिसत आहेत. शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यातही बरीच विषमता दिसून येते. संस्थेचे, महाविद्यालयाचे, प्राचार्यांचे, प्राध्यापकांचे राजकारण हे महाविद्यालयाच्या विकासास मारक ठरत असतानाही त्याची कुठल्याही प्रकारची चौकशी होत नाही.अधिकारी वरपर्यंत पैसे पुरवतात कारण त्यांची नेमणूक ही पैसे घेऊनच केली जाते असे म्हणतात. हे निंदनीय आहे. शिक्षण मंत्री ही तक्रारीची दखल अजिबात घेताना दिसत नाहीत. म्हणून शिक्षण क्षेत्रातली विश्वासहार्यता फार कमी झाली आहे. त्यामुळेच समाजाची पर्यायाने देशाची हानी होत आहे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील सर्व क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या कसून चौकशा करून त्यांची संपत्ती जप्त केली पाहिजे. हे अधिकारी खूप कर्मचाऱ्यांचे शोषण करतात. मरण यातना देतात. जवळजवळ खोटीच कामे करतात. या सर्व गोष्टींचा विचार करून गुणवत्ता पूर्ण शिक्षण कसे मिळेल व भ्रष्टाचार मुक्त शैक्षणिक कार्यालये कशी होतील याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.



वसंत राठोड,
संपर्क क्र. : 9892401089

### लाचखोरीची स्पर्धा थांबणार का ?

वर्तमान पत्र,सोशल मीडिया तसेच दूरचित्राहिन्यांवर दाखविल्या जाणाऱ्या प्रत्येक बातमीत एकतरी बातमी लाचखोरीची असतेच असते. ज्या शिक्षणातून आपण आपले अस्तित्व टिकवून ठेवत ज्ञानोपासना जोपासली त्याच शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचाराची कीड जोपासावी हे "तमसो मा ज्योतिर्गमय" ह्या ब्रीदवाक्याला संपूर्ण पणे छेद देत याचा विपर्यास केला जात आहे. गुरुजी ही संकल्पना जरी मनात आले तरी त्या व्यक्ती अथवा गुरुजी विषयी नितांत आदर व अभिमान वाटायचे.परंतु,त्याच गुरुजीकडून आचरणाचे धडे घेऊन उच्च पदावर विराजमान झाल्यावर भ्रष्टाचाराची रतीब ओढायची व अर्थार्जन कसे साठविता येईल हा एककल्ली कार्यक्रम सर्वदूर जोपासायचे. असा एकही विभाग स्वच्छ राहिला नाही जिथे आपले म्हणणे ,आपली समस्या थोडक्यात मांडून सोडविली गेली असेल. लाचेचे लखलखते डोळे आपल्याला अर्थगर्भित इशारा करतांना दिसतात. लक्ष्मीदर्शन झाल्याशिवाय काम होत नाही.जणू प्रत्येक विभागात "लाचखोरीची स्पर्धा" सुरू झाली की काय असं वाटायला लागलं आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचाराची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे.शासनाने यात पुढाकार घेऊन कुःशासन करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना कडक शासन व्हावे असे वाटते.





प्रमोद कुलकर्णी
संपर्क क्र. : 7249205507

### कुंपणच शेत खात आहे....

जेथे देशाचे भावी नागरिक घडतात तिच यंत्रणा भ्रष्टाचाराचाने बरबटलेली असेल तर त्या देशाचे भवितव्य नक्कीच धोक्यात आहे असेच म्हणावे लागेल .ह्या भ्रष्टाचारा बद्दल आता सामूहिक आवाज उठवणे गरजेचे झाले आहे. सामान्य नागरिकांनी सुद्धा या मध्ये सहभाग घेणे त्यांचे कर्तव्य आहे.शिक्षकाच्या मान्यतेपासून ते विद्यार्थीच्या प्रवेशा पर्यंत पैशाची जी मागणी केली जाते ती मानवी दृष्टिकोनातून अशोभनीय वाटते. आणि आता तर शिक्षण आयुक्तांनी त्या लाचखोरांवर खुली चौकशी करावी म्हणून दिलेले पत्र आणि त्यामागील उद्देश, भूमिका प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे. आणि आता तर लाचखोरांची एक जमात उदयास येत आहे ही दुर्देवी बाब आहे. आणि त्यात शासकीय यंत्रणा सुद्धा सहभागी होत असल्याने कुपाटी शेत खात आहे तर न्याय कोणाकडे मागावा अशी अवस्था शिक्षण खात्याची झाली असे वाटते.



अमर चव्हाण
संपर्क क्र. : 9960391846

### 'त्या' लाचखोरांवर थेट कारवाई करा...

राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांचे प्रथम अभिनंदन करायला पाहिजे. त्यांनी शिक्षण विभागातील त्या चाळीस लाचखोरांची खुली चौकशी करायला लावणारे दिलेले पत्र एका निःपक्ष आणि प्रशासनाच्या स्वच्छ प्रतिमेचा आदर्श नमुना म्हणावा लागेल. प्रत्येक सरकारी विभागात खोलवर रुजलेला भ्रष्टाचार हा त्या विभागप्रमुखास माहितीच असतो. त्या त्या विभागात वरपासून खालपर्यंत एक साखळी भोबाटा न करता हे कृत्य खुलेआम करीत असते. या खुल्या चौकशीचा प्रत्येक विभागात वरंवटा फिरवल्यावर आपणास कोमात गेल्याशिवाय पर्याय उरणार नाही इतके घाणरेडे, गलिच्छ आणि डोळ्यात खोलवर बोटे घालणारे वास्तव सर्वत्र बघायला मिळत आहे. पवित्र शिक्षण क्षेत्रात राहून लाचखोरीची गुलाबी चादर पांघरणा-यांना आता सोडू नये, किंवा त्यांची गय केली जाऊ नये. आता थेट कारवाई अपेक्षित आहे.

# महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेबद्दल केंद्र सरकार ना महाराष्ट्र सरकार गंभीर : खासदार सुप्रियाताई सुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईत वसतीगृहात मुलीवर झालेल्या बलात्काराची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. एकतर महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेबद्दल केंद्रसरकार गंभीर आहे ना महाराष्ट्र सरकार गंभीर आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी माध्यमांशी बोलताना तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महिलांचे, मुलींचे वसतीगृह आहे तिथे कॅमेरे व चांगली लॉकींग सिस्टीम व मुलींची सुरक्षितता याला प्राधान्य दिलेच पाहिजे. आता तर सातत्याने मुलींच्या किंवा महिलांच्या विरोधात ज्या घटना घडत आहेत त्याबाबत केंद्र व राज्यसरकारचा अप्रोच आहे त्यावरुन ते गंभीर दिसत नाहीत हे दुर्दैवी आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. ज्याने कृत्य केले त्याने आत्महत्या केली आहे त्यामुळे आता पहिल्यांदा वसतीगृहाची सुरक्षितता, त्यामध्ये हेल्पलाईन असतील, अलार्म बेल आणि कॅमेरे यांना प्राधान्य देत सरकारने लवकर पाऊले टाकली पाहिजे अशी स्पष्ट भूमिका खासदार सुप्रियाताई सुळे यांनी मांडली आहे.

डाळींचे दर वाढले आहेत याचे मला आश्चर्य वाटत नाही कारण दोन वर्ष सातत्याने संसदेत



वाढत्या अन्नधान्याच्या किमतीवर बोलत आहे. केंद्रसरकारकडे स्टडी पॉलिसी नाहीय. कांद्याची जगात कमतरता होती परंतु महाराष्ट्रात सरप्लस कांदा होता त्यावेळी कांदा एक्स्पोर्ट करा असे आम्ही सांगत होतो मात्र तो केला नाही. आज ना कांद्याला भाव नाही ना इतर वस्तूंना आहे. शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. डाळीचे भाव गगनाला भिडले आहेत. यामध्ये केंद्रसरकारचे सातत्याने गैरव्यवस्थापन दिसून येते असा थेट हल्लाबोलही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केला. मला गंमत आणि आश्चर्य एका गोष्टीचे वाटते की जेव्हापासून भाजप सरकार सत्तेत आले आहे तेव्हापासून सारखे वातावरण दुषित का होते आहे असा थेट सवाल खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पत्रकांरानी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केला. नगरची घटना घडली आता कोल्हापूरमध्ये घटना घडली आहे सारखेच तणावाचे वातावरण राज्यात कसे होते असा सवाल करतानाच अशाच गोष्टी घडत राहिल्या, दंगली होत राहिल्या तर यामुळे राज्याचे नुकसान होणार आहे अशी भीती व्यक्त केली. शिवाय जनता ही घाबरलेली व बिथरलेली आहे त्यामुळे हे गृहमंत्रालयाचे अपयश आहे असा आरोपही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केला.

देशातून किती विरोध होतो आहे हे आता भाजपच्या लक्षात आले आहे. आंदोलन करणाऱ्या मुलींचे गाऱ्हाणं ऐकायला इतके दिवस का लागले ? याचा अर्थ त्यांना अपयश दिसत आहे, देशातून रोष दिसत आहे. या देशातील प्रत्येक महिलेला राग आला आहे. ज्या सरकारने 'बेटी पढाओ, बेटी बचाओ' चा नारा दिला त्यांनी त्यांच्या बेटीला न्याय दिला नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भाजपच्या विरोधात द्वेष आणि राग आहे. आंदोलनकर्त्या मुलींवरील अन्याय केला आहे ही चूक भाजपच्या लक्षात आल्यावर शेवटी 'देर आये दुरुस्त आये' असा टोलाही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी भाजपला लगावला.

# रेल्वे अपघाताचा सीबीआय तपास

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** सीबीआयने मंगळवारी बालासोर रेल्वे अपघातप्रकरणी एफआयआर दाखल करून तपास सुरू केला. या अपघातामागे रेल्वेचा निष्काळजीपणा कारणीभूत होता की बाह्य घटकांनी केलेला घातपात याचा तपास सीबीआयद्वारे केला जाणार आहे. या अपघातात २८८ जणांचा मृत्यू झाला असून १,१०० पेक्षा जास्त जण जखमी झाले.

सीबीआय आतापर्यंत कधी रेल्वे अपघाताची चौकशी केली नव्हती. अपघातानंतर करण्यात आलेल्या प्राथमिक तपासात गाडयांची उपस्थिती दर्शवणाऱ्या इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणालीमध्ये छेडछाड करण्यात आल्याचे आढळले होते. त्यामुळे या अपघातामागे घातपात असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे तपास सीबीआयकडे सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. सीबीआयच्या १० सदस्यांच्या पथकाने मंगळवारी प्रत्यक्ष माहिती संकलित करायला सुरुवात केली. या पथकाने रेल्वे रुळांची तपासणी केली, सिग्नल कक्षाची पाहणी केली आणि बहनागा बाजार रेल्वे स्थानकाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पथकाबरोबरच्या न्यायवैद्यक तपासणी पथकानेही सिग्नल कक्षातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. तसेच त्यांनी निरनिराळया उपकरणांचे कामकाज जाणून घेतले. या अपघातामागे तृणमूल काँग्रेसचा हात असल्याचा



गंभीर आरोप पश्चिम बंगालमधील भाजपानेते सुवेंदू अधिकारी यांनी केला. अपघात दुसऱ्या राज्यात झाला असताना तृणमूलचे नेते अस्वस्थ का आहेत, असे ते म्हणाले.

अर्थसंकल्पावरून मोईली यांची टीका रेल्वे अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये एकत्रित करणे ही भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारची घोडचूक आहे, अशी टीका वरिष्ठ काँग्रेस नेते वीरप्पा मोईली यांनी मंगळवारी केली. रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्रपणे मांडण्याची पद्धत २०१७ पासून बंद आहे, ती पुन्हा सुरू करावी अशी मागणी मोईली यांनी केली. रेल्वेच्या मूलभूत दुरुस्त्या केल्या जात नसताना ते बुलेट ट्रेनबद्दल बोलत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

# देवेगौडांचे भाष्य

आधुनिक केसरी

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठीचे पडघम देशभर वाजू लागले आहेत. विरोधक भाजपाविरोधात आघाडी उभी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. विरोधकांच्या या प्रयत्नाबाबत देशाचे माजी पंतप्रधान आणि जेडी(एस) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एच. डी. देवेगौडा यांनी भाष्य केले आहे. मंगळवारी जेडीएसच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. या देशातील असा कोणता पक्ष आहे, जो भाजपाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडला गेलेला नाही, असा प्रश्नच देवेगौडा यांनी उपस्थित केला. भाजपाविरोधी आघाडीत जेडीएस सहभागी होणार का, असा प्रश्न विचारला असता देवेगौडा म्हणाले, मी राष्ट्रीय राजकारणाचे विश्लेषण करू शकतो. पण त्याचा आज काय फायदा? मला असा एक पक्ष दाखवा, जो भाजपासोबत एकदाही गेलेला नाही. त्यानंतर मी उत्तर देईल. कर्नाटकमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जेडीएसला मोठ्या पराभवाचे तोंड पाहावे लागले. जेडीएसला केवळ १९ जागा या वेळी मिळवता आल्या. त्यासोबतच मागच्या निवडणुकीच्या तुलनेत जेडीएसच्या मतदानाची टक्केवारीदेखील कमी झाली. देवेगौडा पुढे म्हणाले, काँग्रेस कदाचित यावर वाद घालू शकते. त्यांनी कधीही भाजपाला पाठिंबा दिला नाही, असे ते म्हणू शकतात. पण त्यांनी एम करुणानिधी यांना पाठिंबा दिला नव्हता का? त्या वेळी सहा वर्षं त्यांना (भाजपाला) कुणी पाठिंबा दिला. अशा प्रकारची अनेक उदाहरणे आहेत. कधी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे असा पाठिंबा दिला गेला आहे. म्हणूनच मी या विषयावर चर्चा करू इच्छित नाही. या देशातील प्रचलित राजकारणाच्या वातावरणावर मी वाद घालण्याचे कोणतेही कारण नाही. मला हा देश चांगलाच माहीत आहे. मी १९९१ पासून विविध पदांवर काम करत आलो आहे. पंतप्रधानपद, मुख्यमंत्री आणि खासदार म्हणूनही काम केले. या काळात मी ही संपूर्ण प्रक्रिया पाहिली आहे. आणखी एका प्रश्नाचे उत्तर देत असताना देवेगौडा म्हणाले की, या देशात कोण सांप्रदायिक आहे, कुणी नाही. हे मला माहीत नाही. सर्वात पहिल्यांदा सांप्रदायिकतेची व्याख्या व्यापक करायला हवी, कारण त्याची व्याप्ती विस्तृत आहे. पुढील लोकसभा निवडणुकीत भाजपाशी युती करणार का, या प्रश्नावर उत्तर देताना देवेगौडा म्हणाले की, आम्ही लोकसभेआधी होत असलेल्या बंगळुरु स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रित करत आहोत. पुढची लोकसभा निवडणूक लढविणार का? यावर ९१ वर्षीय देवेगौडा म्हणाले की, प्रश्नच उद्भवत नाही. लोकसभा निवडणूक किती उमेदवार लढविणार हे पक्ष ठरविणार आहे. स्थानिक स्वराज संस्थेच्या निकालानंतर किती लोकसभेच्या जागा लढवाव्यात यावर निर्णय घेतला जाईल.

# अत्याचार, आक्रमक आंदोलन आणि न्याय



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतामध्ये विविध जाती धर्माचे लोक राहतात. यांना एकसंघ समान मुल्यावर जगण्याची संधी व संरक्षण भारतीय संविधानाने दिलेले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक माणसाला भारतीय म्हणून मानसन्मान व हक्क अधिकार दिलेले आहेत. संविधानामुळे विषमता, अस्पृश्यता कागदोपत्री बंद झाली असली तरीही आजही अनेक लोकांच्या मनामध्ये विषमता, अस्पृश्यता व भेदभावाची भावना आजही रुजलेली आहे. हजारो वर्षापासून धर्माच्या ठेकेदारांनी विषमता, द्वेष व अस्पृश्यता निर्माण करून लोकांच्या विघटनावर, अज्ञानावर धर्माच्या व जातीच्या नावाखाली धर्माचे व जातीचे नसलेल्या लोकांनी स्वतः ची पोळी भाजुन घेतली व माणसामाणसात द्वेष पसरवून माणसाला माणसापासून दुर करून जाती धर्म अंधश्रद्धा यामध्ये गुरफटून ठेवले.**

विषमतावादी जातीची उतरंड असलेल्या व्यवस्थेमध्ये एक जात दुसऱ्या जातीला श्रेष्ठ व कनिष्ठ समजत होती. खालच्या जातीतील लोकांची प्रगती भरभराट वरच्या जातीतील लोकांना सहन होत नव्हती म्हणून विषमता कायम होती. परंतु संविधानाने सर्वांना एक करून सर्वांना समान हक्क अधिकार बहाल केले. परंतु मागासवर्गीय समुहातील तरुण शिक्षणाच्या माध्यमातून स्वतः चे भविष्य घडवीत असतील तर बऱ्याच जातीवादी लोकांना, कपटी मानसिकतेच्या लोकांना पचणारे नसते. म्हणून मागासवर्गीय लोक प्रवाहामध्ये येऊ नाही म्हणून त्यांच्या वर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणुन किंवा हीन आणि दुय्यम समजून अन्याय अत्याचार केला जातो. जातीय विषमता व जातीय द्वेष भावनेतून झालेले अन्याय अत्याचार माणुसकिला काळीमा फासणारे आहेत. त्यांच्या वर कठोर कारवाई होणे आवश्यक असते. मागासवर्गीय समुहातील व्यक्तीवर जातीय विषमतेच्या द्वेषातून अन्याय अत्याचार झाले तर स्वतःला आंबेडकरवादी समजणारे परंतु स्वहित, स्वार्थ आणि मिळेल तेवढे घेण्याच्या तयारीत असलेले, स्वताचे चळवळीच्या नावाखाली स्वतंत्र दुकान उघडून बसलेले स्वंयघोषीत नेते अन्याय अत्याचार झाल्या नंतर बेंबीच्या देठापासून ओरडून ओरडून सांगतात कि पुन्हा असे काही घडले तर खपवून घेतले जाणार नाही. आरोपींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे वगैरे वगैरे आक्रमक आंदोलन करतात. प्रत्येक दुकानदार आपल्या दुकानाच्या पाटीसोबत निषेध व विरोध करताना दिसतात. प्रकरण गरम आहे तोपर्यंत आपल्या दुकानाची जाहिरात करतात. लोकांना वाटतं आपल्याला न्याय मिळेल परंतु एकाच प्रकरणा साठी शेकडो स्वंयघोषीत नेते वेगवेगळ्या नावाखाली न्यायाची मागणी करतात हा निव्वळ स्वतः ची जाहिरात बाजी करून दुकानदारी चालावी यासाठी केलेला प्रयत्न असतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगुन ठेवले शिका संघटीत व्हा व संघर्ष करा. स्वतः ची दुकानदारी कायम ठेवण्यासाठी संघर्ष गट तट तयार करून करणे सुरू आहे. परंतु एकाच प्रकरणासाठी शेकडो नेते एका मंचावर एका लेबलखाली येत नाहीत. म्हणून पिडीतांना न्याय मिळत नाही व दबाव गट निर्माण होत नाही. स्वतः ला विद्वान, हुशार व चळवळीचा सच्चा कार्यकर्ता समजणाऱ्यांना एकत्र येऊन लढावे एवढेही कळत नसेल तर त्यांची अक्कल, विद्वता व बुद्धीमत्ता कोणाच्या ही कामाची नाही आणि स्वतः च्या दुकानदारीची जाहिरात करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य सांगणे मुर्खपणाचे आहे. पद प्रसिद्धी पैसा मी पणा बाजूला सारून सामाजिक न्यायासाठी आपण न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र येणे हा उद्देश महत्त्वाचा पाहिजे. श्रेय घेण्यासाठी, किंवा चमकेगिरी करण्यासाठी वळवळ करणारा कोणत्याही कामाचा नसतो. म्हणूनच हजारो नेते असूनही पिडीतांना न्याय मिळत नाही कारण संघटीत नाहीत. स्वतःलाच मोठा नेता समजून केवळ दुकानदारीची जाहिरात व्हावी म्हणून एवढे आक्रमक बोलतात, लिहतात असे वाटतं यांच्या बोलण्यातुनच पिडीत व्यक्तीला न्याय मिळेल. परंतु प्रकरण थंडावले की जोरजोरात ओरडणाऱ्या लोकांना न्याय, कौटुंबिक परिस्थिती याचा सोईस्कर विसर पडतो. खैरलांजी, भंडारा महिला ग्रामसेवक, जवखेड-अहमदनगर, नितीन आगे,भिमाकोरेगाव, मुंबई- भांडोर, सिंदखेडराजा,नांदेड, रेणापूर सारख्या प्रकरणात किती न्याय मिळाला ? हा संशोधनाचा विषय आहे. ढोबळमानाने विचार केला तर खैरलांजी प्रकरणात भोतमांगे कुटूंबाला न्याय मिळाला नाही, नितीन आगे प्रकरणात सर्व आरोपीं निर्दोष



सुटतात, भिमाकोरेगाव प्रकरणात मुख्य आरोपी निर्दोष तर निषेध करणारे तरुणांवर गुन्हे दाखल होतात. अशी विपरीत परिस्थिती का निर्माण होते ? तर काही लोक सोईस्कर पणे सांगतात संविधानाची अंमलबजावणी बरोबर होत नाही. मग साधा प्रश्न आहे संविधानाची अंमलबजावणी का होत नाही तर संविधानावर लक्ष ठेवून काम करणारी शक्ति नाही. थोडक्यात आपल्याच अपयशाची गाथा आपण गातो. हजारो नेते हजारो वकील असताना आरोपी निर्दोष सुटतात याचे कारण संख्या असुनही संघटन नाही, एकी नाही. म्हणून व्यक्तीचा जिव जातो तरीही आरोपी निर्दोष सुटतात ही बाब माणुसकिचा खुन करून माणवतेला काळीमा फासणारी आहे. परंतु हत्येचे आरोपी निर्दोष सुटत असतील तर स्वतः ला राष्ट्रीय नेते म्हणणाऱ्या दूकानदारांना काहिच वाटत नसेल का ? प्रकरण असताना जो आवाज जो आक्रमक पणा असतो तो न्याय मिळवून देई पर्यंत कायम का राहत नसेल ? याचे एकच कारण आहे. कोणताही एकटा व्यक्ती कोणतेही सामाजिक काम पुर्ण करू शकत नाही त्यासाठी त्याला संघटन आवश्यक असते. स्वतः च्या गल्लीतील मते ज्यांना मिळत नाहीत, आणि स्वतःच्या गल्लीत ज्यांचे कोणी ऐकत नाही ते लोक जर स्वतः च्या नावासमोर राष्ट्रीय शब्द लावत असतील तर यात अवमान कोणाचा आहे हे तरी तपासून बघणे आवश्यक आहे. अनेक नेते वकील नोकरदार असूनही जर सामाजिक अन्याय अत्याचार होत असतील तर आपण इतरांना कुठपर्यंत दोष देणार ? का हिम्मत होत असेल जातीय व विषमतेतून हत्या करण्याची ? आपण संघटीत होऊन सक्षम झालो नाही. ओरडण्या पलिकडे काही काम केले नाही. स्वतः ची दुकानदारी सोडून सामाजिक न्यायासाठी एकाछताखाली एका विचाराने कोणी पेटत नाही. म्हणून अन्याय अत्याचार सुरुच आहेत आणि न्यायही मिळत परंतु बेकीमुळे आणि स्वतःच्या दुकानदारी मुळे आरोपींचे मनोबळ मात्र वाढत आहे हेही तेवढेच खरे. चँनलवाले बातम्या दाखवत नाहीत अशी ओरड करणारे स्वतः चे चँनल सुरू होण्यासाठी मात्र मदत करत नाहीत. सांगण्याचा मुद्दा हा आहे आपण बुकीने आणि दुकानदारी सुरू करून लढलो तर न्याय मिळणे शक्य नाही. एका छताखाली नेतृत्वाचा व लाभाचा विचार न करता संघटीत होऊन दबाव गट निर्माण करून कायदेशीर मार्गाने न्याय मिळेपर्यंत लढा लढण्याची ताकद निर्माण करणे आवश्यक आहे. आजपर्यंत अनेक अन्याय अत्याचाराचे प्रकरण घडले आहेत परंतु न्याय मिळाला नाही. म्हणून स्वयंघोषीत नेत्यांनी आपली दूकानदारी कुठेही चालवावी परंतु सामाजिक न्यायासाठी, सामाजिक समस्येसाठी एकत्र येऊन लढा देण्यातच शहाणपण आहे. परंतु एका छताखाली येण्यासाठी नेतृत्व, पद, प्रसिद्धी, पैसा, मी पणा, श्रेयवाद आडवा येतो म्हणून म्हणून मजबूत संघटन निर्माण होत नाही परिणामी अन्याय अत्याचार झाला का आठ दिवस इतरांना शिव्या देऊन आक्रमक बोलुन प्रसिद्धी मिळवून घ्यायची आणि न्याया साठी त्यावर लक्ष ठेवायचे नाही किंवा त्याचा पाठपुरावा करायचा नाही. आरोपी निर्दोष सुटले तरीही गप्प बसुन स्वतः ची दुकानदारी सांभाळत बसायचे. जो पर्यंत सामाजिक इमानदारीने मनामध्ये निर्माण होऊन केवळ पिडीत व्यक्ती साठी काम करायचे ही भावना मनामध्ये जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत सामाजिक दबाव गट निर्माण होऊन एकीची ताकत दिसणार. म्हणून फक्त प्रसंगानुरूप आक्रमक होऊन बोलल्या पेक्षा संघटीत होऊन दबाव निर्माण करावा म्हणजे कोणाची अन्याय अत्याचार करण्याची हिंमत होणार नाही.

# उच्चतम लक्ष्य अर्जित करण्यासाठी समर्पित असले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनाचा यथार्थ काय हे समजून घेऊन उच्चतम आति उच्चतम लक्ष्य अर्जित करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल पाहिजे पण सध्या लक्ष्य हिन माणसांची संख्या दिवसेंदिवस प्रचंड वाढत चालली आहे हि खुप कठिण आणि गहण समस्या आहे.उच्चतम लक्ष्य प्राप्ती हिच जीवनाची उदेश पुर्ती आहे. सार्थक आणि निरर्थक हे जीवनातील दोन मुख्य प्रमुख साध्य आहेत. त्यापैकी आपल्या लक्ष्य प्राप्ती धेय्या नुसार परिणाम स्वरूप आपल्या वाट्याला सार्थकता कि निरर्थकता या पैकी एक निश्चित असतं. म्हणजे काय येऊ द्यायचं हे आपल्यावर अंवलबुन असत हे विशेष व महत्वाचं असुन ते आपण निर्धारीत केलेल्या लक्ष्यावर अंवलबुन असत.**

आपल्याला आपल्या जीवनाचा यथार्थ समजला पाहिजे यथार्थ समजला कि आपोआप मन बुद्धी शरिर हे उच्चतम लक्ष्य अर्जित करण्यासाठी समर्पित होऊन करण्यासाठी गतीमान होतात.तस पाहिल तर मानवी जीवन आणि त्या मधील एकुण वेगवेगळ्या अवस्था जसं बाल अवस्था, तारूण्य अवस्था आणि प्रौढ अवस्था या अवस्थेतुन मार्गक्रमण होत असताना त्या त्या अवस्थेतील अपेक्षित लक्ष्य याचा एकंदरीत जीवनाच्य लक्ष्यावर प्रभाव निर्माण होत असतो ,हि खुप महत्वपूर्ण बाब आहे .योग्य वेळी योग्य उच्चतम लक्ष्य निर्धारित करण आणि ते अर्जित करण्यासाठी सत्यनिष्ठ मार्गाचा अवलंब करत धेय्य पुर्ती होणं आवश्यक असतं . वेळ चुकली कि सगळं काही चुकत म्हणून वेळ चुकली नाही पाहिजे.जीवनातील सर्वश्रेष्ठ असं धेय्य उराशी बाळगून अहोरात्र मेहनत करत प्रयत्न करणं आपल्या लक्ष्या प्रति सदैव जागृत आणि सचेत असण कर्म मार्गावर सत्यनिष्ठ आचरण करत उचित लक्ष्य अर्जित करण्यासाठी सदैव तत्पर असण मानवी जीवनाचं सध्या उच्चतम आति उच्चतम लक्ष्य अर्जित करण असतं .पण नेमकं काय उच्चतम लक्ष्य आहे हेच आपल्याकडुन निर्धारीत होत नाही. हिच प्रचंड मोठी गंभीर स्थिती आहे. म्हणून संबंध आयुष्य निघुन जात आणि आयुष्य कसं पुर्ण झालं कधी गेलं हे पण कळत नाही. विशेष बाब म्हणजे लक्ष्य पण साध्य होत नाही. जीवनात काय मिळवलं पाहिजे आणि काय मिळवायचं आहे .हेच अनेक जीवांना माहित नाही हे अगदी वास्तव आहे .म्हणून दिशाहिन विचारांच,आचारांच कोळख सगळीकडे थौमान घालतंय . लक्ष्य उच्चतम नसेल तर आपल्या हातुन अथवा सहयोगाने कोणतं उचित कार्य पार पडेल अथवा तडीस जाईल. लक्ष्य निर्धारीत असेल तर कार्य घडत असतं. अन्यथा आपण काय करतोय हे पण आपल्याला बऱ्याचदा कळत नाही.



इकड तिकडं पाहुण याच त्याच ऐकुन आपण काही तरी करण्याचा प्रयत्न करत असतो. आपण जे करत असतो अथवा प्रयत्न करत असतो ते मुळात उच्चतम लक्ष्य नसतं म्हणून सर्व प्रथम आपण उच्चतम धेय्य काय हे जाणून घेतलं पाहिजे ते जाणल्यानंतर उच्चतम लक्ष्य निर्धारीत करून अर्जित करण्यासाठी आपलं जीवन समर्पित केलं पाहिजे. पण आपण नको ते करण्यासाठी जीवन व्यतित करतो .हा नर देह आपल्याला मिळाला आहे याचा अर्थ उगाच मिळाला नाही एवढं तर निश्चित आहे. त्यापाठी मागे काही तरी मोठा उद्देश आहे पार्श्वभूमी आहे मुळात हे आपल्याला उमजलं पाहिजे समजल पाहिजे. जोपर्यंत आपल्याला हा नर देह कशासाठी मिळाला आहे हेच समजत नाही तो आपला उत्कर्ष होण्यासाठी जे उच्चतम लक्ष्य आहे त्या प्रति आपण आपलं लक्ष्य केंद्रित कसं करणार म्हणून लक्ष्य समजून घेण गरजेचं आहे. आपल्या मनात उच्चतम लक्ष्य निर्धारीत करण्याची ललसा निर्माण झाली पाहिजे. आपल्याला मिळालेला मानवी देह ही काही सहज सोपी गोष्ट नसून सर्वसाधारण बाब देखील नाही. मुळात हा मिळालेला देह सर्वश्रेष्ठ अशा कार्यासाठी कारणी लागला पाहिजे. या देहाच या जन्माचा सार्थक झालं पाहिजे आणि त्यासाठी आपलं लक्ष्य उच्चतम असलं पाहिजे. उच्चतम लक्ष्य अर्जित करणं हेच जीवनाच धेय्य असलं पाहिजे पण बहुतांश लोकांकडे धेय्य नाही लक्ष्य हिच सगळ्यात मोठी समस्या आहे. आपलं शरीर थकत तेव्हा आपण विश्राम करतो त्याला आपण झोप असं संबोधतो. हिच झोप म्हणजे एक प्रकारची निद्रा असते.पण लक्ष्य विरहित जीवन हीच खरी निद्रा आहे आणि ही निद्रिस्त अवस्था संपुष्टात आली पाहिजे. ही अवस्था संपुष्टात जो पर्यंत येत नाही तो पर्यंत जीवनाला फार काही अर्थ नाही. आपण जागे कि झोपलेले आणि जागृत असून उपयोग काय अर्थ हिन जीवन संपुष्टात याव ही प्रत्येक जीवाची अपेक्षा असते. पण त्याच गुह्य समजत नाही हे खुप मोठी अवघड बाब समस्या आहे. आपल आत्म हित आपल्याला समजलं पाहिजे.आणि ते साध्य करण्यासाठी आपण आपलं उच्चतम लक्ष्य निर्धारित करून ते प्राप्त करण्यासाठी जीवन समर्पित केले पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीसंत सखाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## जिल्ह्यात सर्वात जुनी १३६ वर्षांची परंपरा

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव (जामोद):** संत सखाराम महाराज यांनी आपल्या हयातीत सुरू केलेली पंढरीच्या वारीची परंपरा आजही जोपासल्या जात असून ह भ प तुकाराम महाराजांच्या नेतृत्वात श्रीसंत सखाराम महाराज संस्थान सखारामपुर (इलोरा) येथील श्रींची पालखी ही पंढरपूरकरिता सोमवार दि. ५जून रोजी राम कृष्ण हरी च्या गजरात आणि टाळ मृदंगाच्या निनादात सकाळी सात वाजता पंढरपूर कडे रवाना झाली. सुमारे अडीचशे ते तीनशे वारकऱ्यांचा यावेळी सहभाग होता .

बुलढाणा जिल्ह्यातुन पंढरपूर करिता प्रस्थान करणारी ही सर्वात जुनी पालखी परंपरा आहे. १३६ वर्षापासून अखंडपणे ही परंपरा सुरू आहे.

श्रीसंत सखाराम महाराजांनी आपल्या स्वतःच्या कारकिर्दीत तब्बल साठ वर्षे पंढरपूरची वारकरी दिंडीसह पायीवारी केली. त्यानंतर ही परंपरा पुढे गुरुवर्य श्रीराम महाराज (बोवासाहेब) यांनी कायम ठेवली. बोवासाहेबांनंतर ही परंपरा श्रीसंत सखाराम महाराज संस्थानचे विद्यमान अध्यक्ष ह भ प श्रद्धेय तुकाराम महाराज हे चालवीत आहे. त्यामुळे जिल्ह्यात पंढरीच्या वारीची एवढी जुनी परंपरा कायम ठेवणारी ही एकमेव पायी दिंडी असावी. सदर दिंडीमध्ये सुमारे २५० वारकऱ्यांचा सहभाग राहणार असून दिंडी चालक म्हणून ह भ प मुकुंदा बुवा सखारामपुरकर हे राहणार आहेत. सदर दिंडी ही पाच जूनला इलोरा येथून प्रस्थान करून २३ दिवसाचा पायी प्रवास करित २७ जूनला पंढरपूर येथे पोहचेल. भास्तन, माटरगाव, माक्ता, खामगाव, अंत्रज, हिवरखेड, गणेशपुर, उंद्री, टाकरखेड, दिवठाणा, चिखली, रामनगर, वाकी, टाकरखेडा, कुंभारी, कुंबेफळ, गणपती मंदिर जामवाडी, जालना, मेठ पिंपळगाव, लालवाडी, रामनगर तांडा, शहापूर, महाकाळ, नागझरी, गेवराई ,पांडळशिंगी ,पेंडगाव, बीड, पाली, मोरगाव, चौसाळा, पिंपळगाव, ईजोरा, वाकवड, भूम, देवळाली, मांडेगाव, बार्शी, खांडवी, रिधोरे, माढा, उपलाई ,शेटफळ, आष्टी, विसावा या मार्गे ही पायी पालखी दिंडी पंढरपूर येथे आषाढ शुद्ध नवमी २७ जून रोजी पोहोचणार आहे. ह.भ.प. श्रीसंत तुकाराम महाराज हे खामगाव पर्यंत या पायी दिंडी सोबत राहणार असून त्यानंतर ते आळंदी येथील माऊलीच्या दिंडीमध्ये सामील होतील आणि आळंदी ते पंढरपूर अशी पायीवारी करतील. सोमवारी सकाळी सात वाजता संत सखाराम महाराज संस्थान येथून पालखीचे प्रस्थान झाले. त्यावेळी ह भ प तुकाराम महाराज यांचे सह पंढरपूर पर्यंत पायदळवारीत जाणारे २००ते२५० वारकरी आणि पालखीला भेंडवळपर्यंत निरोप देणारे शेकडो वारकरी सहभागी झाले होते.

ह्यावेळी मलकापूरचे माजी आमदार चैनसुख संचेती, राज्य पणन महासंघाचे संचालक प्रसेनजीत पाटील, संस्थांचे व्यवस्थापक श्रीकृष्ण दादा पाटील, विश्वस्त गोपाळ बुवा उरळकर, सौ स्मिता ताई पाटील,मनोहर पाटील वाघ, अनिलभैय्या बकाल, प्रा. नानासाहेब कांडलकर,प्रमोद सपकाळ, भारत राष्ट्र समितीचे समन्वयक राजेश पाटील शीत्रे ,तूकाराम पाटील, रूपराव पाटील,अरविंद पाटील, दीपक पाटील, दत्ता मोरखडे, भागवत अवचार यांच्यासह पंचक्रोशीतील भक्तगणांची यावेळी उपस्थिती होती. ही सर्व मंडळी संत सखाराम महाराज संस्थान पासून तर भेंडवळ बुद्रुक पर्यंत साडेचार किलोमीटर वारीत पायदळ चालले. मलकापूरचे माजी आमदार चैनसुख संचेती हे दरवर्षी ह्या वारीमध्ये सखारामपूर ते भेंडवळ सहभागी होत असतात. सोमवारचा दुपारी भोजनाचा कार्यक्रम भास्तण येथे असून रात्रीचे भोजन आणि मुक्काम हा माटरगाव येथे राहील. मंगळवार दिनांक ६जून रोजी वारी माटरगाव येथून पुढे प्रस्थान करेल.



# शिवराज्याभिषेकदिनी गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** येथील सार्वजनिक वाचनालयात शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थिनी समृद्धी तोडकर हिचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन 6 जूनचे औचित्य साधून भुसावळ येथील कोर्टासमोरील दीडशे वर्षाची ज्ञानदानाची परंपरा असलेल्या सार्वजनिक वाचनालयात कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके, बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांच्यासह सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नितीन तोडकर, संचालक हरीश पाटील, सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे यांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला डॉ. जगदीश पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर वाचनालयाचे ग्रंथपाल नितीन तोडकर यांची सुकन्या व सेंट अलॉयसिस हायस्कूलची विद्यार्थिनी समृद्धी तोडकर हिने दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल शाल व पुष्पगुच्छ देऊन म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके यांनी तिचे कौतुक केले. डॉ. जगदीश पाटील यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाची महती सांगून यंदा आपण 350 वर्षपूर्ती साजरी करत असल्याचेही ते म्हणाले. ललितकुमार फिरके यांनी समृद्धी तोडकर हिचे कौतुक करून तिला भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे यांनी तर आभार ग्रंथपाल नितीन तोडकर यांनी मानले. यावेळी वाचक वर्ग उपस्थित होता.

# नळाला पाणी सोडा अन्यथा आंदोलन : सुनिल पवार

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील शितल माता गल्ली, ब्राम्हण गल्ली, कुंभारवाडा, भिलपल्टन गल्ली, रामवावडी परीसरातील सर्व नागरीक मागील काही दिवसांपासून नळाला आजीबात एक थेंबही पाणी येत नसल्या नागरीकांमध्ये तीव्र नाराजी दिसुन येत आहे तसे नळाला अवेळी पाणी आल्याने ब्राम्हण गल्ली, शितल माता गल्ली, कुंभारवाडा, भिलपल्टन गल्ली, रामबावडी परीसरात मागील काही दिवसापासून नळाला आजीबात पाणी येत नाही नगर परीषदेत तोंडी तक्रार केली असता नगर परीषदेतील कर्मचाऱ्यांनी सांगीतले की सिमेंट रोडचे काम चालू आहे. त्यामुळे पाईप लाईन फुटली आहे पाईप लाईन दुरुस्त करुन आपणास पाणी देऊ, असे बोलून बोळवन हाती देऊन वाटी लावले. नगर परीषदेने तात्काळ योग्य ती पावले उचलून वर नमुद केलेल्या भागात सुरळीत पाणी पुरवठा करून पाणी द्यावे, अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरेल यावेळी सुभाष भिका डोळस, ज्ञानेश्वर डोळस, राम पवार, विशाल नवले, दगडु माने, अशोक मैराळ, रविंद्र मैराळ संतोष मैराळ, गणेश वानखेडे, मनसुब मैराळ गोविंद मैराळ, सविता बडगुजर, अनिल माने, पी.डी. पवार, सुभाष शेजववळ इत्यादी यांची निवेदनावर सहया आहेत.



नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# का होत आहेत घटस्फोट ?



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**सैल होऊ लागले आहेत, नात्यांचे बंध, उरला नाही आदर, आपुलकी आणि प्रेमाचा गंध... गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या महाराष्ट्रात पती-पत्नीमध्ये बेबनाव निर्माण होणे,किरकोळ भांडणे होणे,आणि मुलीने माहेरी निघून जाणे अशा अनेक घटना घडत आहे. दरवर्षी साधारणपणे काही हजारोंच्या जवळपास घटस्फोटाच्या घटना महाराष्ट्रात घडत आहेत. प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह, विवाहबाह्य संबंध, मुलीच्या संसारात माहेरच्या जास्त हस्तक्षेप, मुला मुलींची चंगळवादी वृत्ती अशी अनेक कारणे यामागे आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अपर्णा रामतीर्थकर या तर असे प्रसंग टाळावे म्हणून निरनिराळ्या गावी जाऊन प्रबोधन करत होत्या.**

समुपदेशन करत होत्या त्यांच्या या प्रबोधनाचा प्रमुख हेतू हा लग्न झालेल्या मुली आणि त्याची आई, सासू, हा असा होता. त्या आपल्या भाषणात वेळोवेळी मुलींच्या संसारात माहेरच्यांचा हस्तक्षेप किंवा आईचा हस्तक्षेप नसावा सांगत, त्यांना त्यांचे पातळीवर प्रश्न सोडवू द्यावे असेच त्या सांगत होत्या, तसेच अँड शुभांगी वक्ते या सुद्धा तेच सांगतात की ज्यावेळी मुलीच्या आईचा तिच्या संसारात हस्तक्षेप थांबेल त्याचवेळी घटस्फोटाचे प्रमाण कमी होईल. आजची परिस्थिती बघितली तर मोबाईल हे तर प्रमुख कारण आहेच आणि त्यामुळेच हा हस्तक्षेप वाढला आहे. पूर्वीच्या काळी मुलीला माहेर म्हणून वर्षातून एक वेळेस जाता येत होते. ती आखाजीची म्हणजेच अक्षय तृतीयेची वाट बघायची. परंतु आता तर या मुलींची वर्षभरात त्यांच्या मनाप्रमाणे आखाजी असते. त्यांना वाटेल तेव्हा सासरच्या लोकांचा विचार न घेता ,तब्येतीचा विचार न करता आपल्या मनाप्रमाणेच माहेरी निघून जातात, काही प्रसंगी तर नवऱ्याची परवानगी घेणे हे गौण असते. अर्थातच याला मुलीच्या माहेरच्यांची पुस्ती असते असे म्हटले तरी चालेल. कारण आता वर्षातून दोन-तीन वेळा

माहेरी जाणे होते. आणि प्रत्येक वेळेला दोनतीन आठवडे कधी महिनाभर राहणे होते. तर अशा मुली ह्या सासरच्या पेक्षा माहेरच्या जवळपासच मनाने फिरत असतात सासरी त्यांचे मन रमत नाही.

मोबाईल मध्ये सकाळ- दुपार- संध्याकाळ फोनवर बोलणे चॅटिंग सुरू असते, म्हणजे ते रिपोर्टिंगच असते.

अर्थातच अशा या कारणांमुळे मुली ह्या सतत त्याच वातावरणात मनाने माहेरीच असतात आणि त्यामुळे सासरच्यांशी विशेष संवाद होत नाही आणि त्यांना करावासा वाटत नाही. मुलीला भाजी करायची असल्यास ती लगेच माहेरी आईला फोन लावते आणि विचारते पण सासूला विचारत नाही,काय तर कमीपणा वाटतो आणि सासूने काही विचारले सांगितले तर उत्तर असतं आमच्याकडे असंच करतो. खरं म्हणजे सासरी आल्यानंतर सासरच्या चालीरीती माहिती करून घेणे हे महत्त्वाचे आहे. ,तिथल्या चालीरीतीशी जुळून घ्यायला हवे. मुलीने स्वतः तसा बदल घडवून आणायला हवा आहे. सासरच्यांना बदलवण्याऐवजी स्वतःहात बदल करावा, म्हणजे असे प्रसंग टळतात. काही वेळा तर अगदी किरकोळ कारणावरून वाद-विवाद होतात आणि मग मला कसा त्रास दिला जातो असा हे कांगावा केला जातो. लग्नाआधी मुलीला माहेरी आई किती बोलत असते. अगं ! तुला भाकरी यायला हव्या, तुला पुरणपोळी यायला हवी,तुला हे यायला हवं, तुला ते यायला हवं, तुला रोजचा स्वयंपाक चांगला करता यावा, जो येत नाही. पण मुलीला आईचा राग येत नाही. मात्र सासरी थोडं तरी बोलल ना तर राग येतो.सासूशी तिरप बोलण सुरु होत. नवऱ्याला सांगणं होतं की त्या मला सारखं बोलत असतात. त्यांना सांगून द्या मला असं बोललेलं चालणार नाही. बोलण्यात आई- बाबा हे शब्द तर शक्य तर येतच नाही पण यांना- त्यांना- ते असेच बोलणे असते. यावरून आजकाल मुली सासू-सासऱ्यांचा किती आदर करतात आणि प्रेमाने वागतात हे स्पष्ट दिसते. एकत्र कुटुंब पद्धती तर आता हळूहळू नष्ट होत आहे पण तरीही जिथे आहे तिथे फारशी चांगली परिस्थिती नाही.

काही मुली तर लग्ना आधीच मुलांना अनेक प्रश्न विचारून त्याची परीक्षा घेत असतात आणि आपल्या विचारांशी वागण्याची तो कितपत मिळताजुळता आहे याची पडताळणी करत असतात. आता मुलीला दाखवणे, चहापोहे कार्यक्रम न होता, मुलामुलींची भेट आधी होते. घरी नाही तर कुठे तरी बगीच्यात, हॉटेल मध्ये होते. मुलापेक्षा मुलीचेच प्रश्न अधिक असतात.....

घरात कोण कोण आहे ? आई-वडील आहेत का ? ते किती दिवस आपल्याकडे राहतील ?का त्यांना गावी पोहोचून देणार ?नॉनव्हेज खाणार का ? ड्रिंक्स घेणार का ? अमुक ड्रेस घातला तर चालेल का ? सुटीचा दिवस आपल्या साठी ठेवणार का ? वगैरे वगैरे असे अनेक प्रश्न असतात. .मद्यपान करताना मुली सापडल्याच्या बातम्या आपण बऱ्याचदा वाचतो तसेच मित्रांसोबत स्मोकिंग करताना अनेक मुली मी स्वतः बघितले आहेत. आपण पुरुषांनी सुद्धा व्यसन करू नये असे म्हणतो इथे तर आता मुलीच व्यसनाधीन होत आहेत मग काय बोलणार ? स्वातंत्र्याच्या नावाखाली हा स्वैराचार नाही का ? मुलगा व्यसनी नको असे बरेच मुलीचे आई-वडील अपेक्षा करत असतात तर अशा व्यसनी मुलींचे आई-वडील काय अपेक्षा करतील ? हातात मिळणारा पैसा आणि चंगळवादी वृत्ती आणि पालकाचे नियंत्रण नसणे हेच कारण आहेत. काही मुली तर लग्नाच्या आधीच सांगत असतात आणि त्यांच्या आईची त्या गोष्टीला पुस्ती असते. आमच्या मुलीला तर एकत्र रहायला खूपच आवडते असे सांगितले जाते. परंतु लग्नानंतर लगेच समजते, कारण बऱ्याच ठिकाणी ऐकण्यात येते हळूहळू आपल्या नवऱ्याला सांगणे होते की त्यांना आता गावी पोहोचून द्या. काही प्रसंगी जर अटीतटीवर आल्यावर एकतर ते इथे राहतील नाहीतर मी राहील असेही होते. कारण काय तर त्यांना मुक्तपणे राहाता येत नाही.



आजूबाजूची काही उदाहरणे आहेत की मुला मुलींचे संसार कसे उध्वस्त झाले आहे.

मुलगा चांगल्या नोकरीवर आहे.आई-वडील सुशिक्षित. मुलासह सर्व अध्यात्मिक मार्गात. पगारही चांगला. मुंबईची मुलगी होती, परंतु एकमेकांशी न पटल्याने अवघ्या वर्षाच्या आतच घटस्फोट झाला. कारण काय ? तर पती- पत्नीचा बेबनाव.मला खर काय ते सांगितले नाही. दुसरे कुटुंबातला मुलगा चांगल्या नोकरीला. स्वतःचं घर,फोर व्हिलर गाडी, दोन मुले पत्नीला ही नोकरी, सात आठ वर्षाचा संसार पण अचानकच काय झाले, मुलीची आई मुलीला घेऊन जाते. अचानक असे काय झाले तर किरकोळ कारणावरून पती-पत्नीचे वाद झाले,ते असे विकोपाला गेले त्याचे रूपांतर असे झाले.वाद विकोपाला का गेलेत कोणी सांगत नाही..

एका कुटुंबात मुलाची नोकरी चांगली. घरची श्रीमंती. मुलाचे लग्न झाल्या नंतर मुलीची विक्षिप्त वागणूक आणि दीड वर्षाचे काळातच घटस्फोट. कारण काय मुलीने सांगितले माझे दुसऱ्या मुलासोबत प्रेम होते परंतु जबरदस्तीने माझ्या मनाविरुद्ध हे लग्न केले.तर एका कुटुंबात मुलगा डॉक्टर घरात आई वडील सुनेच कोणाशी पटत नाही. घरी कोणी पाहुणे आले तरी सासू-सासऱ्याशी बोलणार नाही. आलेल्यांना नमस्कार करेल पण घरात सासू सासऱ्यांना नमस्कार करणार नाही. आलेल्या पाहुण्या समोर मुद्दाम अशा रीतीने अपमान करायचा.

तर एका कुटुंबात सासू मुलगा सून सोबत राहतात. सासरा नाही. लग्नानंतर कुरबुरी सुरू होते परंतु मजल इथपर्यंत जाते की मुलाला सांगितले जाते यांना वेगळे काढून द्या. या असेपर्यंत आपला संसार सुखाचा होणार नाही. सासूशी बोलणार नाही, तिने केलेला खाणार नाही, अशी भूमिका.

काही ठिकाणी मुलगा, सून लग्नानंतर परदेशात जातात... तिथेच स्थाईक होतात. वादाचा प्रश्नच नाही.. तुम्ही रहा तिथे... आम्ही रहातो ईथे... काही कुटुंबात धूसपूस असते पण ती बाहेर जाऊ नये म्हणून प्रयत्न करतात पण भिंतीला कान असतातच.प्रत्येक कुटुंबात वेगवेगळे प्रकारची तऱ्हेवाईक वागणूक बघायला मिळते. बऱ्याच वेळा तर किरकोळ वादाला मोठे स्वरूप आणले जाते. आणि मुलगी माहेरी निघून जाते, अर्थातच माहेरच्या सल्ल्यानेच. तू इकडे येऊन जा... मग बघू. वर्ष दोन वर्ष निघून जातात आणि मग मुलगी नवऱ्याशी बोलते, तुम्ही असं केल तर मी येईल, तुम्ही तसं केलं तर मी येईल, अशा अटी शर्ती. तुम्ही मला घ्यायला या. अर्थातच मुलाकडूनही मुलीला त्रास दिला जात नाही असे नाही. पण एकंदरीत जर प्रमाण बघितले तर कमी आहे. 80/ 20 असे असू शकते कारण मुलींच्या बाबतीत असे झाले आहे, मुलींना पगार भरपूर असतो. एखाद्या वेळेस मुलीला मुलापेक्षा जास्त पगार असतो अशावेळी मुलीचा अहंकार जागृत होतो आणि डिवचले जाते काही वेळेला मुलंही व्यसनाधीन असतात, पैशासाठी त्रास दिला जातो. काही ठिकाणी तर मुलीला घराबाहेर काढून दिली जाते आणि पैशाची मागणी केली जाते . मुलाच्या वडिलाकडूनच प्रोत्साहन असते. अशा केसेस मध्ये नाईलाजाने मुलीच्या वडिलांना कायद्याची कायद्याकडे धाव घ्यावी लागते .ते बरोबर आहे. पण मुलीच्या बाजूने कायद्याचे संरक्षण असल्याने बऱ्याच वेळा बऱ्याच ठिकाणी त्याचा दुरुपयोगच जास्त केला जातो हे सुद्धा योग्य नाही. मुलाच्या बाजूला कायद्याचा धाक असतो त्यामुळे मुलाकडून त्रास द्यायचा घटना घडतात परंतु प्रमाण कमी असतात.त्यांना शिक्षाही होते, परंतु मुलीकडून जर मानसिक त्रास झाला तर मुलगा काही करू शकत नाही. बऱ्याच वेळा पॅकेज वाढीच्या नादात मुलींचे लग्न उशिरा होते किंवा बऱ्याच वेळा मुलींचे पॅकेज जास्त असल्यामुळे तसे मुलं मिळत नाही. मुलींची वय वाढते. अशा वेळेला 40 /41 वयात मुलाचा शोध घेता स्थळे मिळत नाही मग थोडी तडजोड करून लग्न ठरता.त्यामुळे आई-वडिलांनी योग्य वेळेतच या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवे. लग्न म्हणजे फक्त दोन जीवांचेच मिलन नाही तर दोन वेगवेगळ्या कुटुंबांचे मिलन असते. त्यांच्यात नाते प्रस्थापित होते. त्यामुळे दोघे कुटुंबाने एकमेकांच्या विचारांचा आदर करणे हे तेवढेच महत्त्वाचे आहे. पूर्वीच्या काळी आई मुलीला सासरी रवाना करताना, "मुली सासर हेच तुझे यापुढे स्वतःचे घर आहे" तू आमच्याकडे येशील तरी पाहुणे म्हणूनच. असे सांगायची. परंतु आता वेळप्रसंगी मुलगीच आईला सांगते का मी तुला जड झाली आहे का ? आईला हे सांगायचे असते की तू आता सासरच्या माणसात जाऊन तिथे तुझं मन रमव. त्यांच्या आनंद तो तुझा आनंद हे मानायला शिक, तरच तू तुझ्या संसारात यशस्वी होशील. सासू-सासरे असतील तर त्यांनाच स्वतःची आई वडील समज त्यांचा योग्य तो आदर कर. मान ठेव तू त्यांना प्रेम देशील तर तुलाही त्यांच्याकडून भरभरून प्रेम मिळेल. आपल्या सुनेच सासू-सासरे चारचौघात भरभरून कौतुक करतात.कुटुंबात सुसंवाद महत्त्वाचा आहे. त्यानेच एकोपा. प्रेम टिकून रहाते. ह्याच गोष्टी समजून सांगण्याची वेळ आलेली आहे. त्याचबरोबर लग्नानंतर जर मार्गदर्शनासाठी सासरी आल्यानंतर आई मुलीचे ऑनलाईन कोचिंग क्लास घेत असेल आणि मार्गदर्शन करत असेल तर ते पहिल्यांदा बंद व्हायला हवे. प्रत्येक आईने मुलीला हाच कानमंत्र द्यायला हवा... "तू अशी वाग की, इकडे तुझी वहिनी सून म्हणून येणार तेव्हा तिने आमच्याशी, तुझ्या भावाशी, आणि एकूणच कुटुंबाशी कसे वागावे असे तुला वाटते, तू त्यापेक्षाही चांगली वाग, म्हणजे तुझं सासरी कौतुकच होईल". अशा गोष्टी जर मुलींनी खरंच लक्षात ठेवल्या आणि त्याप्रमाणे वागल्या तर नक्कीच होणारे घटस्फोट थांबतील किंबहुना घटस्फोट हा शब्दच आपल्याला ऐकायला मिळणार नाही अशी आपण अपेक्षा करूया.

# सीमेपलीकडून भारताला अस्थिर करण्याचा कट



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सीमेपलीकडून दहशतवादी घुसवण्याच्या आणि अशा प्रकारे भारताला अस्थिर करण्याच्या उद्देशाने पाकिस्तानमध्ये असलेल्या तळांवरून दहशतवादी टोळ्यांकडूनकोण कोणत्या प्रकारच्या कारवाया केल्या जात आहेत, हे आता कुणापासून लपून राहिलेले नाही. भारताला त्रास देण्यासाठी सतत नवनव्या क्लृप्त्या आखल्या जात असतात. मात्र अलीकडच्या काही काळापासून त्यांनी नवीन 'शस्त्र' वापरायला सुरुवात केली आहे. हे शस्त्र म्हणजे ड्रग्ज. भारतात ड्रग्ज पाठवायचे, जेणेकरून त्याकडे आकर्षित झालेल्यांना ड्रग्ज मिळणे सोपे होऊन जाईल. नुकतेच सीमा सुरक्षा दलाने पंजाबमधील अमृतसर येथे आंतरराष्ट्रीय सीमेजवळ पाकिस्तानी ड्रोन पाडून तीन किलोपेक्षा जास्त म्हणजे सुमारे एकवीस कोटी रुपयांचे हेरॉईन जप्त केले.**

अलीकडच्या काही महिन्यात अशा अनेक घटना सिमेवर घडल्या आहेत. पाकिस्तानच्या हद्दीतून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करताना किंवा ड्रोन किंवा इतर मार्गाने भारताच्या सीमावर्ती भागात मादक पदार्थांची खेप पाठवताना सर्रास लोक पकडले जात आहेत किंवा ड्रोन पाडले जात आहेत.गेल्या महिन्यातच, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने केरळच्या समुद्रकिनाऱ्यावर एका पाकिस्तानी नागरिकाला सुमारे 1200 कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांसह पकडले. परवा मंगळवारी अमली पदार्थ नियंत्रण ब्युरोने ( एनएसबी ) अमली पदार्थ एलएसडीचा आतापर्यंतचा सर्वांत मोठा साठा जप्तकेला आहे. या कारवाईत तब्बल एलएसडी १५ हजार ब्लॉट्स जप्त केले असून, त्यांची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात १० कोटी आहे. डार्क नेटद्वारे कार्यरत ६ ड्रग्ज तस्करांना अटक करून मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. आजवर झालेल्या कारवाईत देशातील सर्वात मोठा साठा जप्त केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.अटक झालेल्या विद्यार्थी व तरुणांना 'विकर'सारख्या गुप्त इंटरनेट आधारित अँप्स व मेसेंजर चा वापर करीत मात्र ओळख

लपवून काही तरुण कार्यरत होते. हे तरुण २५ ते २८ वयोगटातील आहेत. भारतातील तरुणांना मादक



पदार्थांचे व्यसन लावण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरल्या जात आहेत आणि तरुणांना सहजरित्या ड्रग्ज उपलब्ध होत आहे. त्यामुळे देशापुढील काळजी वाढली आहे. पंजाब गेल्या दीड दशकांपासून अंमलीपदार्थांच्या विळख्यात कसा अडकला आहे आणि त्याचा तिथल्या सर्वसामान्यांच्या जीवनावर कसा परिणाम झाला आहे, हेही सगळ्यांना ठाऊक आहे. यावर 'उडता पंजाब " सारखे सिनेमेही निघाले आहेत. सामाजिक स्तरावर काही नियमही बनवण्यात आले आहेत. अशाप्रकारे जर समाजातील बहुसंख्य लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या नशेत बुडाली असेल, तर प्रत्येक स्तरावरील विकास आपोआपच खुंटतो. पंजाबचे उदाहरण समोर आहे, जिथे तरुणांसह मोठ्या प्रमाणात लोक विविध प्रकारच्या ड्रग्जचे बळी ठरले आहेत.आता याकडे लक्ष जायचे कारण म्हणजे तेथील लोकांसमोर या समस्येवर मात करणे मोठे आव्हान बनले आहे. पंजाबमधील जनता आता त्यांच्या स्तरावर ड्रग्जच्या विरोधात जागरूक होत आहेत. पण पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांच्या नेत्यांनी ड्रग्सच्या परिणामातून निर्माण होणारी कमजोरी ओळखली आहे आणि ते ड्रोन, घुसखोरी किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पंजाब तसेच जम्मू-काश्मीरमध्ये ड्रग्जची तस्करी करत आहेत. गुजरातमध्ये तर अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात ड्रग्ज साठे सापडले आहेत. समुद्रमार्गे हे मादक पदार्थ भारतात येत आहेत.

किंबहुना, अमली पदार्थांच्या व्यसनाच्या आहारी गेलेले लोक कोणत्याही देशासाठी किती धोकादायक आहेत आणि कोणत्या प्रकारची समस्या बनू शकतात याची चांगली कल्पना असे करणाऱ्या गटाला असते. या जाळ्यात अडकलेल्या किशोरवयीन आणि तरुणांना कोणत्याही गुन्हेगारी कृत्याकडे सहज ढकलले जाऊ शकते, देशाविरुद्ध प्रतिगामी विचारांनी अनुकुलित केले जाऊ शकते. कदाचित त्यामुळेच पाकिस्तानी हद्दीतून कार्यरत असलेल्या दहशतवादी टोळ्या एकीकडे जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरीच्या रणनीतीवर काम करतात आणि दुसरीकडे पंजाबमधून शांतपणे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मादक पादार्थांची खेप पाठवतात. खरे तर आता काश्मीरमध्येही तिथल्या तरुणांना छुप्या पद्धतीने ड्रग्ज पुरवले जात आहेत, जेणेकरून त्यांना व्यसनाधीन करून त्यांच्या इच्छा पूर्ण करता येतील. सत्य हे आहे की, जेव्हापासून भारताने दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे, तेव्हापासून पाकिस्तानमधील तळांवरून कार्यरत असलेल्या दहशतवादी गटांना थेट दहशतवादी कारवाया करणे कठीण झाले आहे आणि अशा घटनांमध्ये घट झाली आहे.त्यामुळेच आता इथल्या तरुणांना ड्रग्जच्या जाळ्यात अडकवून त्यांचे आणि पर्यायाने देशाचे मोठे नुकसान करायचे आहे. साहजिकच, सरकारने आता या आघाडीवरही सदैव जागरुक राहण्याची गरज आहे.

# प्रेमासह सामाजिक आणि नैतिक भान देणाऱ्या 'कविता : विशीतल्या आणि मिशीतल्या'



शरद ठाकर
मो.नं. ८२७५३३६६७५

आधुनिक केसरी

**'कविता विशीतल्या आणि मिशीतल्या ' हा मधुकर जाधव यांचा कवितासंग्रह शीर्षकापासूनच आकर्षणाचा विषय वाटतो. या संग्रहात एकूण ७१ कविता असून, या कविता दोन भागात विभागलेल्या आहेत.पहिल्या भागात शीर्षका प्रमाणेच विशीतल्या कविता आहेत. काव्यलेखनाची सुरुवात बहुतेक करून तारुण्याच्या काळात होते आणि त्या तारुण्याच्या काळात कवीचे आकलन, त्याचे रुचीचे विषय यानुसार कविता लेखन व कवितेचे विषय त्या कवितेतून येत असतात, पण तारुण्यात काव्य लेखन करणारे बहुतेक कवी प्रेम कवितेपासून काव्यलेखन करतात. विशीतला काळ हा कोणावर तरी प्रेम करण्याचा, झुरण्याचा असतो.**

त्याप्रमाणे मधुकर जाधव यांनी पहिल्या भागात प्रेमकविता घेतलेल्या आहेत. कवीही माणूस असतो. माणूस म्हटला की तोही कोणावर तरी प्रेम करतो. परंतु कोण काय म्हणेल म्हणून बरेच कवी प्रेम कवितेला आपल्या कवितासंग्रहात जागा देत नाहीत. परंतु मधुकर जाधव यांनी प्रेम कवितांचाच एक विभाग केलेला आहे. प्रेम म्हणजे वासना, विकार न ठरता प्रेम ही एक निकोप, निरागस भावना असली पाहिजे. प्रेम फक्त प्रियकर प्रेयसीचेच असते अशातली गोष्ट नाही. तर जीवनात प्रेम करण्यासारख्या अनेक गोष्टी असतात. ज्यावर आपण प्रेम करावे, पण तसे होताना दिसत नाही. उगाचच कुणावर एकतर्फी प्रेम करणे चुकीचेच आहे. प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र आहे. प्रत्येकाची आवड निवड ही वेगळी असू शकते, म्हणून मला जे आवडते. ते प्रत्येकालाच आवडेल ही अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे.त्यातून अपेक्षाभंग होऊन नको ते घडते. प्रेमाच्या, विरहाच्या, रुसण्याच्या, फुगण्याच्या, स्वप्नाच्या अनेक कविता विशीतल्या कवितेत आहेत.

मिशीतल्या कविता या भागातील कविता ह्या प्रेमाच्या रंगीबेरंगी स्वप्निल दुनियेतून बाहेर आल्यानंतर खऱ्या अर्थाने जगणे आणि जीवन काय आहे याचे भान आल्यानंतर, जीवनातले टक्के-टोम्पे खाल्ल्यानंतर जगण्याचे प्रगल्भभान आल्यानंतरच्या कविता ह्या भागात आलेल्या आहेत.आपल्याला कविता बदलली असे वाटत असले, तरी कविता तीच असते.फक्त आपल्या जगण्याचे संदर्भ बदललेले असतात. तारुण्यात प्रेम, प्रौढत्व आले, की घर संसार आणि त्यासोबतच अनेक समस्या अशा बदलामुळे आपल्याला कविता बदललेली वाटते, परंतु कविता तीच असते फक्त त्या कवितेचे विषय आणि आशय मात्र बदललेले असतात. याबद्दल ते म्हणतात.

**' कविता कविताच असते**
**विविध अर्थछटा मांडणारी**
**आयुष्याचे दुवे सांधणारी**
**बदलत जातात शब्द, अर्थ**
**फार तर कवितेचे विषय'**

लोकप्रतिनिधींच्या भूलथापांना, स्वार्थी राजकारणाला आणि त्या स्वार्थी राजकारण्यांच्या आश्वासनांना भुलणाऱ्या मतदारांना ते त्यांच्या कवितेच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम करतात. कारण कुठलाही पक्ष सत्तेत येईपर्यंत जनतेच्या सोबत असतो. त्याला सर्वसामान्यांबद्दल कळवळा असतो आणि तेच जेव्हा सत्तेवर येतात तेव्हा त्यांना कोणाबद्दलही आस्था वाटत नाही. शेतकरी, शेतमजूर यांचे नित्याचे प्रश्न त्यांना सोडवावे वाटत नाहीत, की शेतमालाला हमीभाव मिळवून द्यावा वाटत नाही. गरीबी, बेरोजगारी, खून, स्त्रियांवर होणारे अत्याचार हे थांबवावे असे कोणालाही वाटत नाही. त्यांना फक्त स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी सत्ता पाहिजे असते आणि ती मिळवण्यासाठी ते नैतिकता, नितीमत्ता, निष्ठा या सर्व गोष्टी गौण ठरवून राजकारणी लोक आपला स्वार्थ साधून घेत असतात, तर सर्वसामान्य कार्यकर्ते मात्र नीतिमत्ता, निष्ठेच्या नावाने नको त्या माणसांमागे लागून आपले कामकाज सोडून त्यांच्या मागे भटकत असतात. आपल्या मतलबापुरता गोड बोलणारा, कौतुक करणारा आपला माणूस जेव्हा त्याचा स्वार्थ साधला की बदलतो. तेव्हा सर्वसामान्याला काहीच करता येत नाही. त्यामुळे मतदारांनी जागरूकपणे विचार करून निस्वार्थपणे चांगले काम करणाराला मतदान केले पाहिजे. तरच आपली लोकशाही टिकून राहिल हे ते पुढील शब्दात सांगतात.

**'मतदारांनो जागरूक राहा**
**नका पडू बळी भूलथापांना**
**मतदानाचा हक्क बजावून**
**वाचवा प्राण लोकशाहीचे'**

या कवितासंग्रहात आई-वडील,आजी यांच्यासह देश प्रेमावरच्याही कविता आहेत. बऱ्याच वेळा काही लोक आपल्या मायबापाने आपल्यासाठी काय करून ठेवले आहे असे विचारत असतात, परंतु त्यांना या गोष्टीची जाणीव नसते, की हा प्रश्न विचारण्यापूर्वी आपण मुलगा म्हणून आपल्या माय बापासाठी काय केले आहे. 'जावे त्याच्या वंशा' या कवितेतून बापाचे कठोर वागणे काय आणि कसे असते, त्यांच्या वागण्यातल्या कठोरपणाही का महत्त्वाचा असतो आणि त्या कठोर वागण्यातही आपले हीत कसे आहे हे ते सांगतात. मायबापाने माझ्यासाठी काय केले हे समाजातले लोक विचारत असतील, पण कवी मधुकर जाधव यांना हा प्रश्न विचारणे सयुक्तिक वाटत नाही. कारण समाजातला प्रत्येक मुलगा आदर्श पुत्र म्हणून वागला पाहिजे असे त्यांना वाटते म्हणून ते म्हणतात.

**'आज जरी समाज निष्ठूर आहे**
**अनैतिकतेचे जिथे काहूर आहे**
**दुर्जनांच्या भरलेल्या मैफिलीत**
**सज्जन म्हणून जगायचे आहे'**



अशा पध्दतीने प्रत्येकाने स्वतःहून सज्जनासारखे वागायचे ठरवले, तर समाजात वृध्दाश्रम चालवायची वेळ येणार नाही. आज आपण दुसऱ्याच्या नावाने खडे फोडतो. आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी काहीच केले नाही म्हणतो, पण आपण याही गोष्टीचा कधीतरी विचार केला पाहिजे, की माझ्याही कामगिरीचे मूल्यमापन माझ्यानंतर येणारी पिढी करेल तेव्हा मलाही त्यांना उत्तर द्यावे लागेल. या गोष्टीची जाणीव ठेवून प्रत्येकाने वागले तर सर्वांनाच चांगले दिवस यायला वेळ लागणार नाही, म्हणून जल, जंगल, जमीन, नैसर्गिक पर्यावरण यांचा व्यवस्थित वापर करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी आपण प्रत्येकाने घ्यायला पाहिजे. तरच येणारी पिढी आपल्याला माफ करेल, एवढेच नाहीतर मानवतेचे,

संस्कारशीलतेचे, प्रेमाचे, आपलेपणाचे, आपुलकीचे जे विविध जाती धर्मातील एकोप्याचे नातेसंबंध आहेत. त्याचा वसा आणि वारसा आपण पुढच्या पिढ्यांना दिला पाहिजे. ज्या पद्धतीने बिजाचे अंकुरात, अंकुराचे रोपात, रोपाचे महावृक्षात रुपांतर होते आणि तो वृक्ष फळं, फुलं, सावली, ऑक्सिजन आणि बरेच काही माणसाला देतो. ही त्या झाडामधील देण्याची वृत्ती, दातृत्वशीलता माणसात उतरावी ही अपेक्षा कवी मधुकर जाधव यांनी केली आहे. ही अपेक्षा म्हणजे जणू आधुनिक पसायदानच म्हणावे लागेल ते म्हणतात.

**'बीज, अंकुर, रोपटं, महावृक्ष**
**असे निसर्गनियम अबाधित राहो**
**ही अपेक्षा आता पिढीजात व्हायला हवी**
**सावली देण्याची अंगभूत काला**
**माणसालाही अवगत व्हायला हवी'**

माणसाला वरवर सुंदर होण्यासाठी, दिसण्यासाठी ब्युटीपार्लर आहेत. ज्यामध्ये माणसाचे वरवरचे सौंदर्य वाढवता येते. वरवरच्या सौंदर्यापेक्षा माणूस मनातून सुंदर, निरोगी असला पाहिजे यासाठी समाजात ब्युटी पार्लर सारखे माणसाला विचारशील, सुसंस्कारित करणारे 'थॉट पार्लर' निर्माण व्हावेत असे त्यांना वाटते. जागतिकीकरणाच्या झपाट्यात माणूसही बदलत चालला आहे. सोशल मीडियामुळे तर तो अधिकच संकुचित होतो आहे. समोरासमोर भेटणाऱ्या माणसाला बोलायला वेळ नाही, पण ऑनलाईनच्या माध्यमातून एकमेकांबद्दल उगाचच आपलेपणा दाखवला जात आहे. 'युज अँड थ्रो' च्या जमान्यात माणसाचा वापरही 'युज अँड थ्रो' सारखा करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे, हे कुठेतरी थांबले पाहिजे असे त्यांना वाटते. शेतकरी, मराठी भाषा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीचा विचार, तरुणाई, विविध प्रवृत्ती, मन अशा काही विषयांवरच्या कविता अभंग छंदातून कवी मधुकर जाधव यांनी उत्तमपणे मांडलेल्या आहेत. मधुकर जाधव अभंग छंद उत्तम प्रकारे हाताळू शकतात. एकंदरीतच विशीतल्या आणि मिशीतल्या ह्या कविता माणसाला प्रेमाच्या दुनियेची सफर करत सामाजिक आणि नैतिक भान देणाऱ्या कविता आहेत. कवितासंग्रहास साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी श्रीकांत देशमुख यांची नेटकी पाठराखण लाभलेली असून, चित्रकार अरविंद शेलार यांचे मुखपृष्ठ असून प्रा.प्रशांतकुमार डोंगरदिवे यांची कल्पक रेखाटने आहेत. अशा या सर्वांग सुंदर संग्रहास खूप खूप शुभेच्छा!

कवितासंग्रह - कविता : विशीतल्या आणि मिशीतल्या

**कवी - मधुकर बालासाहेब जाधव**
**प्रकाशन - परिस पब्लिकेशन,सासवड.**
**पृष्ठ -१२०, मूल्य -१७०**

**समीक्षक**
**शरद ठाकर**
**सेलू, जि.परभणी**
**८२७५३३६६७५**

# महाभारतातले "शकुनी मामा" काळाच्या पडद्याआड !

आधुनिक केसरी

गुफी पेंटल यांनी 1980 च्या दशकात अनेक भूमिका साकारल्या आहेत. अभिनयात पदार्पण करण्यापूर्वी ते इंजीनिअर होते. बी. आर. चोपडा यांच्या 'महाभारत' मालिकेतून त्यांना खरी ओळख मिळाली. या मालिकेत त्यांनी शकुनी मामाची भूमिका साकारली होती.गुफी पेंटल यांना लोक टीव्ही शो 'महाभारत'मधील शकुनी मामा म्हणून ओळखतात. त्यांचा मोठा चाहता वर्ग होता. पण गुफी पेंटल अभिनेता होण्यापूर्वी लष्करात होते. पण त्यांचा भाऊ अमरजीत पेंटल हे आधीच बॉलिवूडमध्ये अभिनेते म्हणून काम करत होते. अशा परिस्थितीत आपल्या भावाला पाहून गुफी पेंटल यांनीही मुंबईत येऊन अभिनेता म्हणून आपला ठसा उमटवला.गुफी पेंटल यांनी 'महाभारत'सह अनेक टीव्ही शोमध्ये काम केले. ते 'अकबर बिरबल', 'सीआयडी' आणि 'राधा कृष्ण' सारख्या अनेक शोमध्ये दिसून आले. पण, गुफी यांना खरी ओळख बीआर चोप्रा यांच्या 'महाभारत' या मालिकेतून मिळाली. 'महाभारत'मध्ये शकुनी मामाची भूमिका साकारून ते घराघरात पोहचले होते. आजही लोक त्यांना 'शकुनी मामा' या नावाने ओळखतात. त्यांनी साकारलेली ती भूमिका हीच त्यांची ओळख बनली होती.चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर गुफी पेंटल यांनी 'दावा', 'सुहाग', 'देश परदेस' आणि 'घूम' यासारख्या चित्रपटांमध्ये आपल्या शानदार अभिनयाने सर्वांची मने जिंकली. टीव्ही आणि चित्रपटांमध्ये काम करण्याव्यतिरिक्त, गुफी पेंटल यांनी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम केले होते. स्टार प्लसवरील 'जय कन्हैया लाल की' हा त्यांचा शेवटचा शो होता.गुफी पेंटलच्या जाण्याने त्याच्या सर्व चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. या अभिनेत्याने या जगाचा निरोप घेतला असला तरी ते चाहत्यांच्या आठवणीत सदैव जिवंत राहतील त्यांना विनम्र आदरांजली !





राजू जाधव, मांगूर, जि. बेळगाव

# लोकप्रतिनिधी हे समाजाचे आदर्श असावेत !



दत्ताराम दळवी,
मो.नं. 9820527855

आधुनिक केसरी

**नम्रता हा गुण सर्व गुणांपेक्षा जास्त किंमती व मौलवान आहे, तो ज्याच्याकडे आहे त्याच्या भोवती कितीही बलाढ्य स्पर्धक असले तरी तो घाबरत नाही तर तो आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. या प्रमाणे आपले पूर्वज किंवा राजे महाराजे यांच्या कडे नम्रता, शितलता आणि संगम हे गुण होते म्हणूनच ते आपली कारकिदं यशस्वी करू शकले. अशी अनेक उदाहरणे देता येतील. भारत देश हा लोकशाहीप्रधान देश आहे. येथे सर्वांना आपले मत मांडण्याचे स्वातंत्र आहे. आपल्या देशाच्या अनेक नेत्यांचे सामाजिक कार्य हे सुदा फार मोठे आहे. पूर्वजांच्या समाजकार्याचे आदर्श आपल्या समोर आहेत. त्यांचेच अनुकरण करुन आपण वावरतो आहोत, मग ते राजकिय असो किवा सामाजिक असो.**

मोठ्या लोकांच्या शेजारी उभं राहील म्हणजे मोठं होता येतं की नाही ते माहीत नाही पण चांगल्या लोकांच्या सोबतीत राहून नक्कीच मोठं होता येतं. म्हणूनच तर आम्हाला चांगल्या लोकांचा अभिमान आहे. आम्हाला राजकारणात जायचे नाही परंतु सर्वसामान्य जनतेला राजकारणाचा कंटाळा येऊ लागला आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आपले राजकारणी. लोकसभा, विधानसभा किंवा महापालिका सभागृह असो ही सर्वच ठिकाणे मंदीरतुल्य समजली जातात. येथे भारतीय संविधानाचा आदर ठेवूनच सर्व कामकाज पाहिले जाते. मात्र अलिकडच्या काळात या कामकाजात फारच मोठा बदल झालेला सर्वसामान्य जनतेला वाटतो. याचे मुख्यकारण म्हणजे लोकसभेच्या, विधानसभेच्या किवा महानगरपालिकेच्या सभेच्या वेळी होणारा गोंधळ पाहीला की आमच्यासारखी सर्वसामान्य जनता संभ्रमात पडते. कारण त्या सर्व सभागृहात होणारा गोंधळ घटनेला धरून असतो काय ? असा प्रश्नही सर्वसामान्य जनतेला पडतो. आपले मतप्रदर्शन करणे हा आपला जन्मसिध्द हक्कच नव्हे तर आपल्याला घटनेनेच दिलेला तो अधिकार आहे.

गेल्याच आठवड्यात लोकसभेमध्ये झालेला गोंधळ सर्वांचे लक्ष वेधून गेला. पंतप्रधानांनी वार्षिक अर्थसंकल्पावर भाषण देत असताना विरोधकांनी पंतप्रधानांचे भाषण संपेपर्यंत म्हणजे अर्धा तास गोंधळ घालून व्यत्यय आणला. हे सर्व हास्यपद होते. या शिक्षित । खासदारांपेक्षा शाळेतील लहान मुले बरी असे म्हणण्याची वेळ आली आहे. लोकसभाध्यक्षांचे कुणीही ऐकत नव्हते. तरीही पंतप्रधानांनी न थांबता आपले भाषण चालू ठेवून गोंधळ करणाऱ्यांना चपराक दिली. भारताच्या संविधानाप्रमाणे सर्वांना आपले मत मांडायची मोकळीक आहे. जर पंतप्रधानांचे भाषण शांतपणे ऐकले असते. तर विरोधकांना त्याच्या भाषणातील अनेक मुद्दे विरोध करण्यासाठी मिळू शकले असते. जर देशाच्या लोकसभेत असा गोंधळ होत असेल तर आणि त्यासाठी कायद्याची काहीच तरतूद नसेल तर इतरांनी या मोठ्या लोकप्रतिनिधींकडून काय बोध घ्यायचा. महानगरपालिकेतील, विधान परिषदेतील किवा लोकसभेतील सभागृहात विरोधक नेहमीच गोंधळ घालून सभेचे कामकाज बंद पाडतात, अध्यक्षांचा राजदंड पळवतात किवा अध्यक्षांवर धावून जातात मग अशा गोंधळ घालणाऱ्यांवर नियमांचे बंधन का नाही ? शेवटी अशा सभागृहांचे कामकाज बंद केले जाते. यात नुकसान कोणाचे आपलेच आहे ना. अशा गोंधळ घालणाऱ्यांमुळे सभेच्या कामकाजाची वेळ संपते आणि जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबीत राहातात.

कोणत्याही सभागृहात आपले मत मांडण्याचा, अनेक प्रश्न मांडून मार्गी लावण्याचा अधिकार प्रत्येक सभागृहनेत्याला असताना असा गोंधळ घालून कामकाज बंद पाडून जर हे लोकप्रतिनिधी सभेचे नियम तोडत असतील तर त्यांच्यावर कारवाई केल्यास इतर नवोदित खासदार, आमदार व नगरसेवकांना एक नविन आदर्श बघायला मिळेल. म्हणून आता असलेल्या नियमांपेक्षा कडक नियम करुन सभागृहांचे कामकाज व्यवस्थित कसे चालेल आणि जनतेचे प्रलंबीत प्रश्न कसे सुटतील याकडे लक्ष देणे उचीत होईल असे वाटते. यापूर्वी असा होणारा गोंधळ पाहाता येत नव्हता परंतु आता संगणकिय युगात थेटप्रक्षेपण बघण्याची सोय आहे. म्हणूनच सर्वसामान्य जनतेसमोर असा गोंधळ किंवा मोठमोठ्या नेत्यांचा व सभाध्यक्षाचा होणारा अपमान दिसतो. हा गोंधळ किवा होणारे अडथळे बंद होणारच नाही काय ? असा प्रश्न जनतेला पडलेला आहे. जीवशास्त्र समजले नाही तरी चालेल पण आताच्या काळात राजकारण समजावून घ्या, व्याकरणाची भाषा समजली नाही तरी चालेल पण राजकारणाची भाषा कळलीच पाहीजे, चित्रकला आली नाही तरी चालेल काही बिघडणार नाही पण समाज्याच्या समस्यांचे चित्र चांगले रंगवून ते सरकार दरबारी मांडता आले पाहीजे. तरच आपण या राजकारण्यांचे डावपेच समजू शकू अन्यथा सर्व व्यर्थ आहे.

म्हणून सर्व लोकप्रतिनिधींना कळकळीची विनंती आहे की. आपण आपल्याच राजकारणातील लोकांचा मान राखावा. ज्यास्त करुन कोणत्याही सभागृहात गोंधळ घालणाऱ्या किवा सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणणाऱ्यांविरुध्द कडक नियम करून आळा घालावा. म्हणजे समाजात आणि जनतेत लोकप्रतिनिधींचा मान राखला जाईल. कारण तुमच्या सारखे राजकारणी येणाऱ्या भावी पिढीचे आदर्श असणार आहात. त्यासाठी वरिष्ठांचा आणि सभागृहाच्या अध्यक्षांचा मान राखल्यास मोठा बदल होऊ शकतो..

# नवी इमारत, जुनेच वांधे

आधुनिक केसरी

**हा भाकरीचा जाहीरनामा, हा संसदेचा रंडीखाना, ही देश नावाची आई  राजरोस निजते कुबेराच्या सोबत... भारतीय संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाची, त्यावरुन उठलेल्या वादंगाची चर्चा सर्वत्र सुरु होती आणि माझ्या डोक्यात विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या वरील ओळी सातत्याने घोंगावत होत्या. अखेर सगळे आक्षेप व सगळे वाद अजगराप्रमाणे गिळून नरेंद्र मोदी यांना केंद्रस्थानी ठेवून भारतीय संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन पार पडले. आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. १९५० पर्यंत देशाच्या संविधानाची निर्माण प्रक्रिया सुरु होती. २६ जानेवारी १९५० रोजी हे संविधान अस्तित्वात आले.  आम्ही भारताचे लोक या शब्दांनी संविधानाच्या प्रास्ताविकाची सुरुवात होते. भारताचे संविधान हे भारतातल्या तमाम लोकांनी स्वत:लाच अर्पण केले.**

अशाप्रकारची प्रस्तावना आणि अर्पणपत्रिका असणारे भारतीय संविधान हे जगाच्या पाठीवरील एकमेवाद्वितीय संविधान आहे. जगाने आदर्श घ्यावा, प्रेरणा घ्यावी असे अनेक महामानव भारतात होवून गेले. यापैकी कुठल्याही महामानवाला हे संविधान अर्पण करता आले असते. पण लोकशाही ही खऱ्या अर्थाने लोकांची आहे, हा देश व या देशातील तमाम संसाधने सर्वांची आहेत हे दर्शवणारी ही अर्पणपत्रिका आहे.  हा देश एकजिनसी नाही. कितीही प्रयत्न केले तरी तो तसा होणे शक्य नाही. या देशात हिंदू आहेत, मुसलमान आहेत, बौद्ध आहेत, शीख आहेत, पारसी आहेत, ख्रिश्चन आहेत, कबीरपंथी आहेत, महानुभावपंथी आहेत, शैवपंथी आहेत, वैष्णवपंथी आहेत, लिंगायत आहेत, जैन आहेत, जैनातही पुन्हा दिगंबरपंथी व श्वेतांबरपंथी आहेत, वारकरी आहेत, नाथ सांप्रदायी आहेत, देवाचे अस्तित्व मान्य करणारे आस्तिक आहेत, देवाचे अस्तित्व नाकारणारे नास्तिक आहेत, अज्ञेयवादी आहेत, संभोगातून समाधी मिळते असेही मानणारे आहेत. पुरुष आहेत, महिला आहेत, तृतियपंथी आहेत, स्वेच्छेने लिंग परिवर्तन करुन घेतलेले आहेत, आदीवासी आहेत, भटके-विमुक्त आहेत,  विवाहसंस्था मानणारे आहेत, ती न मानणारे आहेत, हिप्पी आहेत, समलिंगी संबंध मानणारे आहेत, ते न मानणारेही आहेत. विविध भाषा बोलणारे आहेत, महिनोनमहिने-वर्षानुवर्षे मौन पाळणारेही आहेत. विविध प्रकारच्या वेशभूषा परिधान करणारे आहेत. कसलीच वेशभूषा न घालता नागडे राहण्यात धार्मिकता शोधणारेही आहेत. वैदिक परंपरेला मानणारे आहेत, अवैदिक परंपरेला मानणारेही आहेत. जंगलात राहणारे आहेत, शहरात राहणारे आहेत, गावखेडी, वस्त्या, टापू, समुद्रकिनारे, डोंगरखोरे, पहाड अशाठिकाणीही राहणारे आहेत. भारत हा महाकाय देश आपल्या पोटात अशी अनंत प्रकारची विविधता सामावून घेणारा आहे. ही विविधता आणि अशा विविधतेत जगत असतानाही 'भारतीय' ही एकच ओळख असणे हेच भारताचे खरे सौंदर्य आहे. अशा विविधतेत जगणाऱ्या भारतीयांचे प्रतिनिधीत्व लोकांनी निवडून दिलेले खासदार संसदेत करीत असतात. म्हणून संसद ही कुठल्या एका धर्माचे, जातीचे, प्रांताचे, भाषेचे, वर्गाचे, वर्णाचे, विचाराचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था राहत नाही. तर ती तमाम भारतीयांचे प्रतिनिधीत्व करणारी देशाची सर्वोच्च संस्था ठरते. संविधान हे या संस्थेच्या कार्यपद्धतीचे दिशादर्शक व  मार्गदर्शक दस्तऐवज ठरते.  नरेंद्र मोदी यांना संघ-भाजप परिवाराने २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून समोर आणले. जेव्हा मोदींना देशाचे नेतृत्व म्हणून समोर आणले गेले तेव्हा 'हिंदूत्वाऐवजी विकास' हा 'अजेंडा' लोकांसमोर ठेवला गेला होता हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, प्रचंड बहुविधता असलेल्या या देशात केवळ 'हिंदूत्वाच्या' नावाखाली सत्तेत येणे शक्य नाही हे तेही जाणून होते. म्हणून, दिर्घकाळ सत्तेत राहिलेल्या कॉंग्रेसवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे, कॉंग्रेसविरोधी आंदोलनाला प्रायोजित करणे आणि विकासाचे फसवे 'मॉडेल' उभे करुन लोकांची मते मिळवणे अशा मार्गाने संघ-भाजप सत्तेत आली. या सगळ्या प्रक्रियेत अविवाहित असलेले ( आणि म्हणून त्यांना कसलाही स्वार्थ नाही असा समज निर्माण केलेले ) नरेंद्र मोदी हे या फसव्या विकास अजेंड्याच्या नेतृत्वस्थानी राहिले.  ओठावर राम आणि मनात-डोक्यात नथुराम अशा वृत्तीच्या संघ-भाजपाने सत्तेची पकड घट्ट होताच आपले रंग दाखवण्यास सुरुवात केली. आरबीआय, सीबीआय, ईडी, सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग अशा स्वायत्त संस्थांच्या गळ्यात पट्टे बांधून त्यांना आपल्या सोयीनुसार हाकण्यास सुरुवात केली.



नोटाबंदी, नियोजन नसताना अमलात आणलेली जीएसटी करप्रणाली, प्रचंड वेगाने वाढणारी महागाई, जगात क्रूड ऑईलचे दर घसरलेले असतानाही वाढणाऱ्या इंधन तेलाच्या किमती, बेरोजगारी याने जनता बेचिराख झाली. लोकांना दैनंदिन जीवनातील अडचणींत गुंतवून ठेवून संघ-भाजपाने आपला 'हिंदूत्वाचा' विखारी 'अजेंडा' राबवण्यास सुरुवात केली. वैदिक संस्कृतीचे प्रतिक असलेली स्त्री भारतमाता म्हणून सबंध देशावर लादणे, इतिहासाचे विकृतीकरण करणे, माफीवीराला  स्वातंत्र्यवीर म्हणून मिरवणे, सच्च्या स्वातंत्र्यसनिकांना व हुतात्म्यांना विस्मृतीत ढकलणे, हा देश खऱ्या अर्थाने २०१४ सालीच स्वतंत्र झाला असा समज पसरवणे, देशाचे महत्वाचे पुरस्कार कर्तृत्वशून्य व्यक्तींना देणे, बहुजन समाजातील महामानवांचा अपमान करणे, काश्मीर फाईल्स-केरळा स्टोरी अशा चित्रपटांच्या निर्मितीला प्रायोजित करुन त्याद्वारे समाजात धार्मिक ताणतणाव व भेद निर्माण करणे, पुलवामा सारखी प्रकरणे घडवून आणून आणि सैनिकांची नावं घेवून मतं मिळवणे, सरकारविरुद्ध बोलणाऱ्यांना देशद्रोही ठरवणे, मुस्लिमांना पाकीस्तानात जाण्यास सांगणे असे 'क्रूर हिंदूत्वाचा' अजेंडा राबवणारे अनेक प्रकार करण्यास सुरुवात केली. काही आंधळ्या धर्मभक्तांना व देशभक्तांना धर्माच्या व तथाकथित देशभक्तीच्या अफूने गुंगवत ठेवून आणि त्यांच्यामार्फत आपल्या सरकारची 'वाहवाई' करवून घेत दुसऱ्या हाताने मात्र उद्योगपतींची कोट्यावधीची कर्जे माफ करणे, भांडवलदारधार्जिने धोरण अवलंबणे, अंबाणी-अदाणींना या देशाची नैसर्गिक साधनसंपत्ती व मनुष्यबळ लुटण्यास मोकळे सोडणे, शेतकरी व कामगारविरोधी धोरणे आखणे, फायद्यात असलेल्या सार्वजनिक कंपण्यांचेही खाजगीकरण करुन त्या काही ठराविक उद्योगपतींच्या घशात घालणे असा सगळा बाजार चालवला आहे. मनमाड येथे रेल्वे कामगारांसमोर दिलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की या देशाला दोन प्रमुख शत्रूंपासून धोका आहे. पहिला शत्रू आहे ब्राह्मण्यशाही आणि दुसरा शत्रू आहे भांडवलशाही. बाबासाहेबांची हीच भूमिका आपल्या पोवाड्यातून मांडताना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे म्हणाले होते

**धनवंतांनी अखंड पिळलेl धर्मांधांनी तसेच छळले ।**
**मगराने जणू माणिक गिळिलेlचोर जाहले साव** ।। धनवंत आणि धर्मांधांची क्रूर युती म्हणजे आज सत्तेत बसलेली संघ-भाजप होय.  दुर्दैवाने या संघ-भाजपाच्या धोरणांचा खुलासा करणारे, त्यांचे पितळ उघडे पाडणारे आणि पर्यायी सांस्कृतिक राजकारण उभे करणारे सक्रिय विरोधक आज देशात उरले नाहीत. कॉंग्रेसच्या राहुल गांधींनी भारतभर यात्रा काढून आणि एकाचवेळी सावरकर व अदाणीबाबत स्पष्ट भूमिका मांडून तो प्रयत्न केला पण त्यांना त्यांच्याच पक्षातील नेते आणि सहकारी पक्षातील नेते साथ देत नाहीयेत, एकटे पाडत आहेत. महाराष्ट्रात महविकास आघाडीच्या सभेत वैदिक संस्कृतीचे प्रतिक असलेल्या, हातात ॐ लिहिलेले भगवे ध्वज घेतलेल्या भारतमातेचे पुजन 'मविआ'च्या नेत्यांनी केले. ही भारतमाता महाविकास आघाडीचे दैवत आहे असेही सांगण्यात आले. हिंदू-ब्राह्मणी विषमतावादी संस्कृतीला तमाम देशवासीयांवर लादणारी प्रतिके संघ-भाजपाने मांडली आणि आज त्याच प्रतिकांचा स्विकार संघ-भाजपाचे विरोधकही करताना दिसत आहेत. याचाच अर्थ संघ-भाजपा आणि कॉंग्रेस यांच्यातील लढाई ही केवळ राजकीय सत्तेसाठीची लढाई असून त्याला या देशातील सांस्कृतिक संघर्षाचा, समतावादी व मानवतावादी विचारधारेचा कसलाही स्पर्ष नाहीये. भारतीय संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाची घोषणा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या नव्या इमारतीचे उद्‌घाटन होणार हे जाहीर झाले. काल हे उद्‌घाटन पार पडले. विनायक दामोदर सावरकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून हा उद्‌घाटन सोहळा पार पडला. ज्या व्यक्तीने इंग्रजांकडे दयेची भीक मागून सुटका करुन घेतली, ज्या व्यक्तीने मरेपर्यंत इंग्रजांची पेंशन खाल्ली, ज्या व्यक्तीच्या संघटनेतील लोकांनी स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या खबरी इंग्रजांना पुरवल्या, ज्या व्यक्तीने शिवराय-शंभूराजे या महामानवांना आपल्या लिखानातून दुय्यम लेखले, जो व्यक्ती गांधी हत्येच्या केसमधील आरोपी होता आणि ज्या व्यक्तीने लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षतेवर आधारित व्यापक व सर्वसमावेशक राष्ट्रवाद नाकारुन संकुचित अशा हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना मांडली त्या व्यक्तिच्या जन्मदिनाचे औचित्य साधून संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले यावरुन या नव्या इमारतीत कुठली धोरणे आखली जाणार आहेत, कुणाच्या हिताचे राजकारण केले जाणार आहे हे स्पष्ट होते. एकीकडे संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन होत होते आणि दुसरीकडे भाजपाच्या खासदाराने केलेल्या लैंगिक अत्याचाराविरुद्ध आंदोलनासाठी बसलेल्या कुस्तीपटू महिलांचे आंदोनल पोलिसी बळाचा वापर करुन चिरडले जात होते. देशाच्या संसदेच्या नव्या इमारतीत न्यायाला पायदळी तुडवणारे असे क्रूरकर्मा बसणार आहेत याचेही दर्शन उद्‌घाटनाच्या दिवशीच होत होते. संसदेच्या नव्या इमरतीच्या उद्‌घाटनाचा विधी वैदिक मंत्रोच्चाराने करण्यात आला. भारताचे संविधान वैज्ञानिक दृष्टीकोण रुजवण्याला प्राधान्य देते. हे संविधान संपूर्णतः धर्मनिरपेक्ष असून नागरीकांना धार्मिक आचरणाची मुभा असली तरी राज्याचे कामकाज चालवताना ते धर्मनिरपेक्षपणे चालवण्याची दिशा देणारे आहे. विविध धर्मियांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन हे एका विशिष्ट धर्माच्या विधीद्वारे करणे हे संविधानिक तत्वांची पायमल्ली करणारे कृत्य आहे. ही इमारत नरेंद्र मोदींच्या खाजगी मालकीची इमारत असल्याचाच भास हा सबंध सोहळा पाहताना होत होता. तशाप्रकारचेच वातावरण निर्माण करण्यात आले होते. उद्‌घाटन सोहळा मंत्रोच्चाराऐवजी संविधानाच्या प्रस्तावनेचे आणि संविधानातील महत्वाच्या तरतुदींचे वाचन करुन पार पाडता आला असता. पण ठराविक संस्कृती सबंध देशावर लादण्याच्या कुविचाराने झपाटलेल्या संघ-भाजपाने संविधानातील तत्वे पायदळी तुडवून मनमानी पद्धतीने संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन केले. विशेष म्हणजे या सर्व प्रकाराला आक्षेप न घेता केवळ मोदींच्या हस्ते उद्‌घाटन नको या एकाच मुद्यावर विरोधकही अडून राहिले. संविधानाने राज्य कसे चालावे याची मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. त्यात सामाजिक-आर्थिक-राजकीय न्यायाचा, समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळवून देण्याचा आणि वैज्ञानिक दृष्टीकोण रुजवण्याच्या तत्वांचा अंतर्भाव आहे. या सगळ्याला बगल देवून संघी थाटात संसदेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन झाले ही देशाच्या लोकशाहीला आणि संविधानाला काळीमा फासणारी घटना आहे. संसदेची इमरात नवी झालेली असली तरी या देशातील जनतेला जून्याच संघर्षाला सामोरे जावे लागणार आहे. देशाच्या सर्व क्षेत्रातील उच्चवर्णीयांचे वर्चस्व, उच्चवर्णीयांच्या हिताची असलेली संस्कृती तमाम बहुजनांवर व श्रमिकांवर लादणारा सांस्कृतिक दहशतवाद आणि देशातील धनदांडग्यांकडून होणारे सर्वसामन्यांचे शोषण याच व्यथा तमाम भारतीयांच्या पदरी असणार आहेत. संसदेची इमारत नवी झाली म्हणून या देशातल्या उच्चवर्णीयांचा सांस्कृतिक दहशतवाद संपूष्टात येणार नाही की धनिकांची लूटशाही थांबणार नाही. देशाच्या संसदेची इमारत नवी पण देशातील जनतेचे वांदे जूनेच हे खरे वास्तव असणार आहे. सामान्य लोकांकडून जमवलेल्या कररुपी पैशातील अब्जावधी रुपये खर्चून संसदेची नवी इमारत उभी झाली. पण ती एकट्या मोदींमूळे उभी झाल्याचा समज निर्माण करुन राजेशाही थाटात लोकशाहीच्या वास्तूचे उद्‌घाटन झाले. या नव्या इमारतीत उच्चवर्णीय आणि उच्चवर्गीयांचे दल्ले आपले जूनेच मेंदू घेवून जाणार आहेत. ते देशातल्या श्रमिक, बहुजन समाजासनोर जूनेच वांदे निर्माण करुन ठेवणार आहेत. म्हणून इमारत नवी झाल्याच्या बातम्या वाचून फार हुरळून जाण्याचे कारण नाही.  नव्या इमारतीच्या पायथ्याला ज्या संविधानिक मूल्यांचे दफन करण्यात आले त्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणारा दिवस हाच आपला सुवर्णदिवस असणार आहे आणि संविधानाच्या तत्वानुसार देश चालेल असा काळ हाच आपला अमृतकाळ असणार आहे.

**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
**(मो.9921657346)**

# समुद्राबद्दल ज्ञानवर्धक माहिती कोणती ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकद्दष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर त्याच्या रक्षणाची संधी घेतली जाते. आंतरराष्ट्रीय समुद्र दिनानिमित्ताने संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश, त्यांतील सागरी परिसंस्थेशी संबंधित संस्था, अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक-अभ्यासक मिळून समुद्राविषयीचे विविध पैलू जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतात.**

सर्वांनाच सागराबद्दल कुतूहल असते. अर्धी पृथ्वी जरी आपण तिच्या नैसर्गिक स्वरूपात राखू शकलो, तरी तब्बल दहा लाख प्रजातींना नष्ट होण्यापासून आपण वाचवू शकतो, असा शास्त्रज्ञांचा अभ्यासपूर्ण दावा आहे. सांडपाणी, औद्योगिक प्रदूषके, मुदत संपलेली किंवा घातक रसायने, प्लास्टिकच्या बाटल्या आणि पिशव्या समुद्रात टाकल्या जातात. "कचरा कोणताही असो, फेका समुद्रात! अहो केवढा मोठा आणि खोल समुद्र असतो ? अफाट समुद्राला एवढ्याशा कचऱ्याने काय होतेय ?" असा गैरसमज जगभरातील व्यक्तीपासून राष्ट्रांपर्यंत बहुतेक सर्वांचाच होत असल्यामुळे आता मात्र परिस्थिती गंभीर बनली आहे. मासे मिळवण्यासाठी अधिकाधिक खोल समुद्रात जावे लागत आहे, पाण्याचा दर्जा घसरला आहे. हवामानावर परिणाम होत आहे. विशिष्ट सजीव नष्ट होऊ लागले आहेत... हे सारे थांबविणे, हेच या दिनाचे खरे ध्येय धोरण आहे. जागतिक महासागर दिन जगभर ८ जून रोजी पाळला जातो. सन २००८ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या पाळण्याचे ठरविले. त्यापूर्वी सन १९८२पासून कॅनडामध्ये तो साजरा होत असे. कॅनडास्थित आंतरराष्ट्रीय संस्था महासागरांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे, या संस्थेच्या पुढाकाराने सर्वप्रथम या दिवसाची सुरुवात झाली. वर्ल्ड ओशन नेटवर्क सारख्या विविध संस्था, मत्स्यालये, प्राणिशास्त्र विषयात काम करीत असलेल्या संस्था, अशा महत्त्वाच्या संस्था यासाठी एकत्रितपणे योगदान देतात.  संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर त्याच्या रक्षणाची संधी घेतली जाते. ८ जून हा दिवस विश्व महासागर दिन- संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. संपूर्ण जगभरात या दिवसाला विशेष महत्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या साजरा करण्यास का सुरूवात केली ? तर समुद्र दूषित होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक बनले आहे. या संदर्भातला प्रस्ताव सन १९९२ साली कॅनडाने ब्राझीलमध्ये झालेल्या वसुंधरा शिकार परिषदेत मांडला. त्याला संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००८मध्ये मान्यता दिली. तेव्हापासून दी ओशन प्रोजेक्ट या



अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने हा महासागर दिन आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होत आहे. दरवर्षी एखादा ध्येय ठेऊन हा दिवस साजरा केला जातो. सन २०१८मध्ये प्लास्टिकपासून महासागराचे रक्षण, हे ध्येय ठेवण्यात आले होते. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७१ टक्के भूभाग हा विविध प्रकारच्या जलस्रोतांनी व्यापला आहे आणि त्यापैकी तब्बल ९७ टक्के जलसाठा हा खाड्या, समुद्र व महासागरांच्या रूपात आहे. दी ओशन प्रोजेक्ट या सन १९९७ साली अमेरिकेत स्थापन झालेल्या आणि आता जागतिक झालेल्या प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, संग्रहालये यांच्या संघटनेने एकच महासागर ही संकल्पना मांडली. परंतु भौगोलिकदृष्ठ्या आणि राजकीयदृाही या एकच महासागराची पाच खंडांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे समुद्र हा खाद्य आणि विपुल प्रमाणात ऑक्सिजन पुरविणारा स्रोत आहे. तोच जैवविविधतेचे महाकाय भांडार आहे. खरे तर तोच अनेकविध रत्ने, खनिजे, तेल आपल्या उदरात बाळगणारा रत्नाकर होय. ही सर्व वर्णने अपुरी पडतील, अशा अगणित मार्गांनी महासागर मानवासाठी व एकूणातच चराचर सृष्टीसाठी महत्त्वपूर्ण आहे. महासागर कितीही विशाल असले तरी माणसाने केलेला किती कचरा त्यांनी पोटात घ्यावा यालाही अखेर काही मर्यादा आहे. आपण ही मर्यादा ओलांडल्यामुळे तेथील जीवसृष्टीला आणि अन्नसाखळ्यांना धक्का बसला आहे. यामुळे माणसाला मिळणारे मासे तर कमी झाले आहेतच, शिवाय हवामानावरही विपरीत परिणाम होत आहे. मीठागरांना फटका बसत आहे. समुद्रीजल प्रदूषणांमुळे मीठाचे खारेपण ओसरू लागले आहे. शुद्धीकरणास अधिक खर्च येऊ लागला आहे. तेथील मानवी हस्तक्षेप व ढवळाढवळीच्या कारणाने पावसाच्या प्रमाणात चढउतार दिसू लागला आहे. महासागरास जाऊन मिळणाऱ्या घाणेरड्या पाण्याचे प्रमाण हे जास्त, तर अस्सल पाण्याचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. यावरही माणसाला विचार करावाच लागेल, हे निश्चित!



# राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** श्री साई कॉलनी सावखेडा रोड पिंप्राळा येथे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा मोठया उत्सवात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म.न.पा. उपमहापौर कुलभूषण पाटील होते. तर मंचावर सनातन संस्थेच्या साधिका क्षिप्रा ताई जुवेकर , हरिभक्त कीर्तनकार सौरभ महाराज, हिंदु महासभेचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते तुषार सोनार, तसेच बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य सचिव मिलिंद दादा पवार उपस्थित होते. यावेळी मंत छत्रपती शिवाजी महाराज यांची आरतीने जयघोषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सनातन संस्थेच्या साधिका क्षिप्रा ताई जुवेकर यांनी लव्ह जिहाद या विषयावर आपले मत व्यक्त केले. तर हरिभक्त कीर्तनकार सौरभ महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगितला. त्याच बरोबर हिंदू महासभा संस्थेचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष गोविंद तिवारी यांनी छत्रपती शिवरायांचे विचारांची गरज यावर मत व्यक्त केले. तर तुषार सोनार सर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा यावर भाषण केले. यावेळी कुलभूषण पाटील ( उपमहापौर जळगाव ) यांनी त्यांच्या भाषणात युवक वर्गाला व्यसना पासून दूर रहा, व्यायाम करा, छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करा असे भाषणात त्यांनी युवक वर्गाला समज दिली व सर्व उपस्थित शिवभक्तांची मन जिंकुन घेतली. यावेळी कार्यक्रम प्रस्तावना श्री साई कॉलनी मित्र मंडळाचे प्रदीप पाटील यांनी केली. तर कार्यक्रम आभार विजय कासार यांनी शिव प्रेरणा मंत्र म्हणून कार्यक्रमाला पूर्णविराम दिला. यावेळी साई कॉलनीचे जेष्ठ कार्यकर्ते पद्माकर आखडकर, महेंद्र भामरे, भाऊसाहेब पाटील, रवींद्र भागवत, पऱ्हाळे काका, योगेश गोसावी, आशिष सोनवणे, मिलींद दादा पवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यावेळी भोजराज पाटील, प्रदीप चौधरी, महेश वाणी, प्रशांत पवार, राजाराम सोनवणे, कुलदीप शेळके, दीपक डहाते, सागर पाटील, भिकन चौधरी, दर्शन दादा , सुरेश चौधरी, पांडुरंग वाणी, राजेंद्र पाटील तसेच महिला वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते .

# वैजापूर नगरपालिकेला दीड कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर

## माझी वसुंधरा अभियानात वैजापूर सर्वोत्तम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** माझी वसुंधरा अभियान तीन या अभियानांतर्गत २०२२-२३ या वर्षात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल वैजापूर नगरपालिकेला औरंगाबाद विभागातून पहिल्या क्रमांकाचे दीड कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर झाले असून विभागस्तरावर आयोजित भव्य कार्यक्रमात लवकरच मान्यवरांच्या हस्ते या बक्षिसाचे वितरण करण्यात येणार आहे. माझी वसुंधरा या अभियानांतर्गत स्वच्छता, वृक्षारोपणासह अन्य उपक्रम राबवुन निसर्गाचा समतोल राखण्यात येतो.

२ ऑक्टोबर २०२० पासुन हे अभियान राबविण्यास सुरुवात झाली. एक एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत घेण्यात आलेल्या माझी वसुंधरा तीन या अभियानांतर्गत राज्यातील ४११ नागरी स्थानिक संस्था व १६ हजार ४१३ ग्रामपंचायती अशा १६ हजार ८२४ स्थानिक संस्थांनी सहभाग घेतला होता.

याअंतर्गत वैजापूर नगरपालिकेने जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय, पालिकेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत,

> नगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी यांच्यासह शहरातील नागरिकांनी अभियानात सक्रीय सहभाग नोंदवल्यामुळे हे बक्षीस मिळाले आहे . त्यामुळे हे सर्वांचे यश आहे .
> **भागवत बिघोत, मुख्याधिकारी**

नगराध्यक्षा शिल्पा परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी, कर्मचारी व लोकसहभागातुन अनेक लोकोपयोगी उपक्रम शहराच्या विविध प्रभागात राबवण्यात आले.

त्यामुळे नगरपालिकेस बक्षिसपात्र होण्याचा बहुमान मिळाला. या कामांचे मुल्यांकन करण्यासाठी नागरी संस्थांच्या अमृत गटांसाठी ७६०० गुण व अमृत गट वगळुन अन्य नागरी संस्थांसाठी ७५०० गुण ठेवण्यात आले होते. त्रयस्थ यंत्रणांमार्फत कामांचे डेस्कटॉप व फिल्ड ( क्षेत्रीय ) मुल्यमापन करुन लोकसंख्या निहाय अकरा गटातील विजेते ठरवण्यात आले. यात औरंगाबाद विभागातुन वैजापूर नगरपालिकेने प्रथम क्रमांकाचे दिड कोटी रुपयांचे बक्षीस पटकावले आहे. याबद्दल नगरपालिकेचे अभिनंदन होत आहे.



# ते आले, त्यांनी पाहिलं, जाणून घेतलं सारं आता तरी आरक्षण मिळणार का ?

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** काल परतुर शाषकिय विश्रामगृह येथे तसेच तालुक्यातील मौजे वैजोडा येथे थेट राज्यमागास आयोगाच्या निवृत्त न्याय मूर्तिच्या समितिने प्रत्येक्ष भेठ देवून वानदेशी कुनबी समाजाच्या व्यथा जाणून घेत प्रत्यक्ष पाहनी मधून जानून घेतल्या यात जेष्ठ मंडळी महिला माता भगिनी सोबत चर्चा केली असता अयोगाच्या समिति समोर अनेक गोष्ठींचा उलगड़ा या निमित्ताने झाला ज्यात पात्र असूनही हा समाज आज पर्यंत मराठवाड्यातील विदर्भातील वेगवेगळ्या नोंदी मुळे कसा आरक्षणा पासून वंचित राहिला परिणामी समाजाची आर्थिक आणि शैक्षणिक किती हानि झाली आहे होत आहे . याचा पाढ़ाच या समाज बांधवांनी राज्य आयोग समिति समोर वाचून दाखवला व आमच्यावर होणारा अन्याय हा आता आपल्या माध्यमातून सोडवावा आशी मागणी एका निवेदनाद्वारे समिति समोर केली . या वेळी समितिने या समाजाची जीवन शैली राहणीमान घरांची दयनीय स्थिति उत्पन्न ,साधन , शैक्षणिक स्थिति आणि संस्कृतिची निरीक्षने प्रामुख्याने नोंदवली या समितित राज्य मागास आयोगाचे प्रा .डॉ. गोविन्द काळे , डॉ . नीलिमा सरप ( लखाड़े )राज्य मागास आयोग संशोधन अधिकारी मेघराज भाटे , सहायक आयुक्त दत्तात्रय वाघ , संबंधित तहसीलदार ,गट विकास अधिकारी ,तलाठी ग्राम विकास अधिकारी ,यांच्या सह समाजातिल राम कुरहाड़े शिवाजी महाराज भोसले, माधवराव मामा कदम, संतोष दिंडे ,लक्ष्मण शिंदे , अशोक शिंदे , गोविंद यादव, प्रभाकर आढाव, विष्णु शिंदे , सचिन वाघमारे, दत्ता जगदाळे , आदि समाज बांधव मोठ्या संख्येनं उपस्थित होता . दरम्यान संबधित सर्व अधिकारी कर्मचारी यांना या समाजाच्या सर्व नोंदी व माहिती ही पंधरादिवसाच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले . ती माहिती येत्या विधानसभा अधिवेशनातील पटलावर ठेवून या समाजाला न्याय मिळवून दिला जाईल असे या समिति द्वारे समाजाला आश्वासन देण्यात आले . यावेळी वैजोडा येथील ग्रामसेवक सौ . एस. मुळे ( धरत ) सरपंच गिरी , गावातील ईतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# सोयगाव तालुक्यात पोलिस दल, जिल्हा परिषद यांचा संयुक्त उपक्रम ग्राम सुरक्षा यंत्रणा

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** शहरात व तालुक्यात चोरी दरोड्याच्या घटनेत चोर होणार तात्काळ जेरबंद, ग्रामसभा, सरकारी योजनांची ग्रामस्थांना तात्काळ माहिती मिळणार डि.के. गोर्डे संचालक ग्राम सुरक्षा यंत्रणा छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दल व जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचा संयुक्त उपक्रम, जिल्ह्यात होणार ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित जिल्हा पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना प्रयत्नातून, व सयुंक्त विद्यामाने ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत आज वार बुधवार दि. 07 मे रोजी सोयगाव पोलीस स्टेशन येथे ग्राम सुरक्षा यंत्रणेचे 18002703600 प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

सदर कार्यक्रमास डॉ.दिनेश कोल्हे साहेब पोलीस उपविभागीय अधिकारी,उपविभाग सिल्लोड, सपोनि अनमोल केदार सहाय्यक पोलीस निरीक्षक सोयगाव, प्रकाश नाईक गटविकास अधिकारी सोयगाव, सुरे, तायडे नायब तहसीलदार सोयगाव, वंदनाताई पाटील सरपंच जरंडी, गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय अधिकारी, मकरंद कदम जिल्हा समन्वयक ग्राम सुरक्षा यंत्रणा, नारायण खोडे पोलीस गोपनीय अंमलदार, रवी तायडे, राजू बर्डे यांच्यासह सोयगाव पोलीस स्टेशनचे अंमलदार व हद्दीतील सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष,पत्रकार बांधव, अशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पोलीस स्टेशन हद्दीत संकट काळात आपत्तीग्रस्त नागरिकाने ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोलफ्री नंबर 18002703600 वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तत्काळ ऐकवला जाणार असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणेचे संचालक श्री.डी.के.गोर्डे यांनी नागरिकांना यंत्रणेचे प्रात्यक्षिक दाखवले,सोयगाव पोलीस स्टेशन हद्दीतील गावातील नागरिकांनी यंत्रणेत पुढील 48 तासांत सहभागी होण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे संयोजन सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार सोयगाव पोलिस स्टेशन यांनी केले.

# टोमणे मारणाऱ्या सासूचा केला खून

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** माहेरच्या लोकांविषयी आणि घरातील काम करण्यावरून वारंवार सुनेला टोमणे मारणाऱ्या सासूचा सुनेने कुऱ्हाडीने घाव घालून खून केला. ही थरारक घटना भिवापूर तालुक्यातील झिलबोडी गावात घडली. हिराबाई सिद्धार्थ पाटील ( ४५, झिलबोडी ) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी सून रक्षंदा पाटील ( २२ ) हिला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झिलबोडी गाव असून तेथे सिद्धार्थ पाटील यांचे कुटुंब राहते. ते आणि पत्नी हिराबाई शेती कसतात तर मुलगा रवी हा खासगी वाहनावर चालक आहे. रवीचे दोन वर्षांपूर्वी नागभीड येथील रक्षंदा हिच्याशी लग्न झाले. रक्षंदाची आई रेल्वेत नोकरी करते. त्यामुळे रक्षंदा उच्चशिक्षित असून नातेवाईक असलेल्या शेतकरी रवीशी लग्न करून देण्यात आले. लग्न झाल्यानंतर काही दिवसांतच सासू हिराबाई ही सुनेला टोमणे मारत होती. तसेच वाद घालून अपमान करीत होती. वारंवार माहेरच्या लोकांना शिवीगाळ करून दोष देत होती. सासूच्या नेहमी टोमणे मारण्याच्या सवयीला कंटाळून रक्षंदा लग्नाच्या तिसऱ्याच महिन्यात माहेरी निघून गेली. तिच्या पाठोपाठ पती रवीही सासरी राहायला आला. तो एका कॅटरर्सकडे वाहन चालविण्याचे काम करीत होती. दोघांचा संसार व्यवस्थित सुरू असताना त्यांना एक गोंडस बाळ झाले. दोघांहीनी बाळासह घरी परतण्याचा निर्णय घेतला. रक्षंदा ही पती आणि बाळासह सासरी राहायला आली. नातू बघून हिराबाई यांचा स्वभाव बदलेल असा विश्वास रक्षंदाला होता. मात्र, सासरी आल्यानंतर दुसऱ्याच दिवसांपासून सासू टोमणे मारायला लागली. चार महिने सुनेने दुर्लक्ष केले. परंतु, सासूचा मानसिक आणि शारीरिक त्रास वाढल्यामुळे सुनेने तिचा काटा काढण्याचा कट रचला.

## महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

**स्त्रीयांना होणाऱ्या समस्या**
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

**पुरूषांना होणाऱ्या समस्या**
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.



# वैजापुरात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा पुतळा परिसरात शहरातील सर्व शहर वासीयांच्या उपस्थितीत आनंद, उत्साह व छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या जय घोषणांनी मंगळवार( ता.०६ )रोजी संपन्न झाला. आ. रमेश पा. बोरनारे, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धभिषेक व जलाभिषेक करण्यात आला व जय घोष करण्यात आला. या प्रसंगी माजी शिक्षणाधिकारी व समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी तात्कालीन शिवराज्याभिषेक सोहळ्याची माहिती दिली. आ. रमेश पा. बोरनारे यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभीकरण साठी एक कोटी दहा लक्ष रुपये दिले तर महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळा परिसर सुशोभीकरण ला पन्नास लाख रुपये दिल्या बद्धल त्यांचे आभार मानण्यात आले. या प्रसंगी आयोजक शिवसेना शहर प्रमुख पारस घाटे, प्रवीण कोतकर, प्रेम राजपूत, हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान शैलेश चव्हाण, तालुका प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, अंकुश हिंगे,निवर्तमान नगरसेवक डॉ. निलेश भाटिया,दशरथ बनकर, इम्रान कुरेशी, उल्हास ठोंबरे,अमोल बोरनारे, संजय बोरनारे, बाबासाहब जगताप, अशोक पवार आप्पा, प्रशांत त्रिभुवन, गुळस्कर, युवा सेनेचे श्रीकांत शिंदे, मुळे, कांशीराम राजपूत, महेंद्र काटकर, भगवान साळुंकेउपस्थितीत होते.या प्रसंगी उपनगराध्यक्ष साबेरखान, एकनाथ जाधव, ज्ञानेश्वर जगताप, डॉ. राजीव डोंगरे यांनी ही भेटी देऊन छत्रपती महाराज पुतळ्याला अभिवादन केले.

# तारकंपाऊंडचे ४५ लोखंडी खांब चोरीला

## परतूर शिवारातील घटना, गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शिवारातील गट क्रमांक ९० / ७ मधील अरुण राऊत या शेतकऱ्याच्या शेत तारकंपाऊंड चे ४५ लोखंडी खांब चोरट्याने लांबवल्याची घटना ४ जून रोजी घडली. परतूर पोलीसात अज्ञात चोरट्या विरोधात चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. लोखंडी तारकंपाऊंड असणाऱ्या शेतकऱ्यांची चिंता यामुळे चांगलीच वाढलेली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की परतूर शिवारात ग्रामीण रुग्णालया जवळ माने वस्ती भागात अरुण बापुराव राऊत यांची बागायती शेती आहे . शहराच्या जवळ शेती असल्याने मोकाट जनावरे व डुकरांच्या त्रासातून पिकाचे संरक्षण हेतू त्यांनी अडीच एकर शेतावर लाखो रुपये खर्चुन लोखंडी तार कंपाऊंड करण्यासाठी २२५ सहा फुटी एंगल शेतात रोवले होते .काही दिवसानंतर त्याला काटेरी तार लावण्याचे नियोजन सुरू असतांनाच दि. ४ जुन रोजी ते शेतात गेले तेव्हा ४५ एंगल ज्याचे वजन २७० किलो होते ते चोरुन नेल्याचे त्यांना दिसून आले . परतूर पोलीसात शेतकरी अरुन राऊत यांच्या फिर्यादीवरून भादवी कलम ३७९ अन्वये अज्ञात चोरट्यांच्या विरोधात दि.६ जूनला गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो . ना . गाढवे करत आहेत .

दरम्यान शेतातील तारकंपाऊंड सारख्या लोखंडी खांबाच्या चोऱ्याकडे चोरट्यांनी आपला मोर्चा वळवल्याने लोखंडी तारकंपाऊंड असलेल्या शेतकरी वर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे . अशा चोरांचा छडा न लागल्यास अनेक शेतकऱ्यांनी शेतीला केलेल्या लोखंडी तारकंपाऊंड च्या चोऱ्या वाढून शेतकऱ्यासमोर वेगळेचं संकट उभे राहू शकते . लोखंडी तार कंपाऊंड करण्यासाठी शेतकऱ्याला एकरी एक ते दिड लाखाचा खर्च येत असल्याने कंपाऊंड च्या खांबाची चोरी करणाऱ्या चोरांची चांगलीच दहशत शेतकऱ्यामध्ये निर्माण झालेली आहे . त्या सोबतच शेतकऱ्यांचा पिक संरक्षणाच्या महत्वाचा प्रश्नही ऐरणीवर आलेला आहे .

# अनाथ बालकांना शालेय साहित्य वाटप; केवट समाजाचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथे ज्या मुलांचे मातृ पितृ छत्र हरपले आहे अशा केवट समाजातील मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये तसेच त्यांच्या पाठीमागे कुणीतरी आहे ही भावना त्यांच्या ठाई असावी या उद्देशाने या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देण्यात आले. समाजाचे आपण काही देण लागतो या एकमेव उदात्त हेतूने "मदतीचा देऊ हाथ अनाथांचे होऊ नाथ" हा समाजहितकारी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी...., या उक्ती प्रमाणे समाजातील काही बांधवांनी समाजाचे आपण देण लागतो या भावनेतून सदर उपक्रमास क्षणाचाही विलंब न लावता स्वतःहून मदत केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुनील बिथरे ( केवट ) यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहूणे म्हणून जेष्ठ नागरिक सिताराम मख्रिजे दुसरबीड,शिवलाल बिथरे दुसरबीड,जेष्ठ माता मथुराबाई परसने,मेहकर श्रीमती रानुबाई बिथरे दुसरबीड,योगेश तागवाले ( सेवानिवृत्त बँक मॅनेजर, कन्नड ), श्री.संदीप परसने सर ( खापरखेडा ),अनिल दूंड्यार( केवट मार्बल्स, कन्नड ), संदीप केवट ( अध्यक्ष -शालेय व्यवस्थापन समिती हतनूर ), रवींद्र मगरे ( कन्नड ) यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक ज्ञानेश्वर देव्हरे तर सूत्रसंचलन रामेश्वर देव्हरे,अनिल बरांडे यांनी केले.



# अंबड तालुक्यातील चिंचखेडजवळ महसूल पथकाने पकडला विनानंबर वाळूचा हायवा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तालुक्यात गोदावरी नदी पात्रातून होत असलेल्या वाढत्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीमुळे तहसीलदार चंद्रकांत शेळके व महसूलचे वाळू बंदी पथक ऍक्शन मोडवर आले आहे. काल दि. 05 रोजी सोमवारी पहाटे 6 वाजता केलेल्या कारवाई नंतर आज दि.6 मंगळवार रोजी सकाळी 7 वाजता 2 ब्रास वाळू घेऊन जाणारा विना नंबरचा छोटा हायवा चिंचखेड जवळ महसूल पथकाने पकडला आहे. 15 लाख रुपयाचा हायवा व 10 हजार रुपयांची वाळू असा 15 लाख 10 हजार रुपयाचा मुद्देमाल महसूल विभागाकडून जप्त करण्यात आला आहे. महसूल पथक अवैध वाळू वाहतूक करणाऱ्याच्या गस्तीवर असतांना गोंदी येथून चिंचखेड कडे येणारा विना क्रमांकाचा हायवा 2 ब्रास वाळूची वाहतूक करत असतांना महसूल पथकाने पकडला आहे. संबंधित हायवा हा रवी वाघमारे रा. गोंदी यांचा असल्याचा सांगण्यात आले. पकडलेल्या छोट्या हायवामध्ये 2 ब्रास वाळू व हायवाअसा सुमारे 15 लाख 10 हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या हायवावर दंडात्मक कारवाई होणार असल्याचे महसूल पथकाने सांगितले. ही कारवाई तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखालीमहसूल सहाय्यक प्रवीण पवार, तलाठी राम महाले, कृष्णा मुजगुले कोतवाल अशोक शिंदे,मनोज उघडे, मनिष जिरेकर,संदीप धारे,योगेश जिगे यांनी केली आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर



घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# जगद्गुरु तुकोबाराय वैकुंठगमन सोहळ्याचा मान नाशिकला

## भरवसफाटा येथे आयोजन : जिल्ह्यातील पहिलाच कार्यक्रम असल्याने लाखो उपस्थितांचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकोबारायांनी सदेह वैकुंठगमन केले. हा दिवस तुकाराम बीज म्हणून साजरा केला. तुकोबांच्या वैकुंठ गमनाला सन २०२४ - २५ दरम्यान ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने निफाड तालुक्यातील भरवस फाटा येथे दि.२ एप्रिल ते दि. ८ एप्रिल २०२४ या कालावधीत जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचा मान नाशिकला प्रथमच मिळत असून भरवस फाटा येथे सोहळ्याचे आयोजन नियोजित असून जिल्ह्यातील हा पहिलाच कार्यक्रम असल्याने लाखो उपस्थितांचे नियोजन करण्यात येणार आहे. आद्यशंकराचार्य स्थापित चार धर्मपीठातील जगद्गुरुंना या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात येणार आहे. तुकोबारायांचे वंशज देहूकर महाराज यांचेसह सर्व संतांचे वंशज, संस्थानांचे पदाधिकारी, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, केंद्रीय मंत्री आदी राजकीय नेत्यांची उपस्थिती या सोहळ्यास राहणार आहे. सोहळ्यासंदर्भात ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाभरातील वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी निफाड, येवला, चांदवड, सिन्नर, कोपरगाव या पाच तालुक्यांतील नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. या सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह, श्री तुकोबाराय जीवन चरित्र कथा व पाच हजार गाथा वाचकांचे संगीत गाथा पारायण होणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री क्षेत्र देहू येथून पायी ज्योत आणण्यात येणार असून या पादुका निफाड, येवला, चांदवड, सिन्नर, कोपरगाव या पाच तालुक्यांतुन हेलिकॉप्टरने भ्रमण करून कार्यक्रमस्थळी आठ दिवस दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. दि.२ एप्रिल ते दि. ८ एप्रिल या कालावधीत संपन्न होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काळात नाशिक जिल्ह्याअंतर्गत १५ तालुक्यांतून प्रत्येकी एक आदर्श कीर्तनकारास 'धन्य तुकोबा समर्थ' हा मानाचा पुरस्कार सोहळ्याच्या वतीने व श्री तुकोबारायांच्या वंशजांच्या हस्ते दिला जाणार आहे. दैनंदिन कार्यक्रमासाठी वारकरी व



भाविकांची मोठया प्रमाणावर उपस्थिती राहणार असल्याने आजूबाजूच्या तालुक्यातील, गावातील नागरीकांच्या सहकार्याने दैनंदिन पंगतीचे नियोजन ठरविण्यात आले आहे. व्यसनमुक्त होऊ पाहणाऱ्या लोकांना दारूबंदी, आणि व्यसनमुक्तीची शपथ देऊन भगवंत कार्यात सहभागी करून घेण्यात येणार आहे.

या बैठकीस सर्वश्री. तुकाराम म.परसुलकर, ज्ञानेश्वर माऊली शिंदे ( रुई ), बाळासाहेब म.वाकचौरे, समाधान म.पगार, जनेश्वर म. ( भारतमाता आश्रम ), मधुकर म.गडाख, ज्ञानेश्वर म.ठाकरे, श्याम म.गाडे, निलेश म.निकम, सयाजी म.बोंबले, रामदास म.जाधव, बाळनाथ म.देवढे, संतोष म.पोटे, ऋषिकेश म.कुयटे, दत्तु काका राऊत, विठ्ठल अण्णा शेलार, हरिश्चंद्र भवर, शिवाजी जगताप, माणिक म.शेळके, गोरख पवार, संपत ढोमसे, सोपान गायकर, नामदेव रेंढे, पप्पू शिंदे, निवृत्ती जगताप, माधव जगताप, जनार्दन गीते, आदींसह वारकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




# नितीन जाधव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आईसाहेब प्रतिष्ठान व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर बहुजन विकास संस्थेमार्फत अतिशय मानाचा समजला जाणारा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मंत्रालयीन जनसंपर्क अधिकारी तथा राजकीय सल्लागार नितीन जाधव यांना प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांनी आपल्या बुद्धीच्या. जिद्दी च्या, अभ्यासुवृत्तीच्या जोरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय ठसा उमटवला आहे. विशेष म्हणजे मंत्रालयातील जनसंपर्क विषयक बातम्यांच्या कार्यामुळे त्यांचा महाराष्ट्रभर दांडगा जनसंपर्क वाढला असून सामाजिक राजकीय क्षेत्रात प्रभाव निर्माण झाला आहे. त्यांनी

मंत्रालयातील मंत्री आस्थापनेवरील विविध जनसंपर्क विषयक कार्य बातम्यांच्या माध्यमातून विविध खात्यांचे उपक्रम, योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचविल्या आहेत .

मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या दौऱ्यामध्ये खाजगी जनसंपर्क अधिकारी पदी उत्कृष्ट कार्य केल्याने अनेक योजनांचा लाभ जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात त्यांची भूमिका राहिलेली आहे . महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख पदाच्या माध्यमातून राज्यभरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मित्र बांधवांची कामे प्रसिद्धीच्या झोतात न येता पडदया अडून पूर्ण केली. ते विज्ञानासह व्यवस्थापन शास्त्र विषयाचे उच्च पदवीधर असल्याने व्यवस्थापनाचा त्यांना मोठा अनुभव आहे त्याचबरोबर संगणकतंत्रज्ञान, वृत्तपत्रविद्या विषयाची पदवी संपादन केल्यामुळे उत्कृष्ट पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक समाजप्रिय विषय त्यांनी मार्गी लावलेले आहेत. राजकीय. सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकीय क्षेत्रातील त्यांची पत्रकारिता गाजलेली आहे.नितीन जाधव यांनी उद्योगतज्ञ, मार्केटिंग तज्ञ, करिअर मार्गदर्शक, राजकीय सल्लागार, राजकीयविश्लेषक. लेखक, भाषणकार. सूत्रसंचालक, राजकीय रणनीतीकार अशा पद्धतीने अनेक क्षेत्रात वैविध्यपूर्ण वेगळी ओळख निर्माण केली. महायुती. महाआघाडी सरकारमध्ये विविध खात्यांच्या मंत्र्यांचा खाजगी जनसंपर्क अधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केले त्यात जलसंधारण. बहुजन कल्याण, अल्पसंख्यांक, कौशल्य व उद्योजकता विकास, आपत्ती व्यवस्थापन, भूकंप पुनर्वसन, नगर विकास व सार्वजनिक बांधकाम, सन्माननीय मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांचे मुख्यमंत्री कार्यालयाचे बातम्या विषयक कार्य याचा ही समावेश आहे.

सर्वच क्षेत्रातील मित्र, बांधवांचे सहकार्य मला नेहमीच होत आलेले आहे. सदरचा मिळालेला राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मी माझे हितचिंतक, मित्र बांधव व मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी. सर्व पत्रकार मित्र, होतकरू क्रियाशील समाजसेवक यांना अर्पित करतो. या पुरस्कारामुळे मला सामाजिक.सांस्कृतिक. राजकीय क्षेत्रात काम करण्याची ऊर्जा मिळाली असल्याचे मत नितीन जाधव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आईसाहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भोसले व त्यांच्या सर्व टीमचे आभार मानले.

# कर्म. आ. मा. पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक सोहळादिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** कर्म आ. मा. पाटील कला वाणिज्य व कै अण्णासाहेब एन के पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर येथे आज दिनांक 6 जून 2023 रोजी शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळा दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य प्रा के डी कदम डॉ शिरसाठ डॉ सतीश मस्के प्रा प्रदीप सावळे निजामपूर महाविद्यालयाचे डॉ भामरे सेवानिवृत्त कार्यालयिन अधीक्षक श्री विसपुते प्रा डी बी जाधव ग्रंथालय परिचर श्री सुनील पवार उपस्थित होते. प्रा प्रदीप सावळे यांनी शिवराज्याभिषेक सोहळा संदर्भात महत्वपूर्ण माहिती उपस्थितांना करून दिली.



# शिवसेनेच्या वादग्रस्त विधानांचा मविआवर काहीही परिणाम नाही : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेनेच्या नेत्यांनी वादग्रस्त विधाने केल्याचा कोणताही परिणाम महाविकास आघाडीवर होणार नाही, असे स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले. आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणूकी पूर्वी त्यांनी राज्यात चाचपणी करायला सुरुवात केली आहे.त्याचा भाग म्हणून शरद पवार संभाजीनगर मधे काल पासून आले आहेत. आज त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. संसदेची नवीन इमारत बांधण्याची काहीच गरज नव्हती असे ते म्हणाले. पत्रकारांच्या विविध प्रश्नांना त्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. बीआरएस पक्षाच्या घोषणा आणि अंमल बजावणी यामधील फरक सर्वांनी समजावून घ्यायला पाहिजे.तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातून बीआरएस पक्षात जाणारे फार काही महत्वाचे लोक नव्हते असेही ते म्हणाले. ओरिसा आणि काही राज्यात धार्मिक स्थळांवर होणारे हल्ले ही घटना निंदनीय आहे.त्याच बरोबर हे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत नसल्यामुळे एक दिवस शेतकरी रस्त्यावर उतरतील.संभाजीनगर विभागिय आयुक्तांनी शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी १०हजार रु.मदत द्यावी असा अहवाल शासनाला सादर केला आहे. या संदर्भात आपण संपूर्ण माहिती घेऊनच आपले मत व्यक्त करु असे पवार म्हणाले. राज्यात सध्या भाजप विरोधी ट्रेंड सुरु असून १९७७सारखी परिस्थिती पुन्हा निर्माण होईल असे दिसते असे शेवटी पवार म्हणाले. या पत्रकार परिषदेला आ.सतीश चव्हाण, जिल्हाध्यक्ष केलास पाटील, अंकुशराव कदम, राजेश टोपे यांची उपस्थिती होती.





# राजुरेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** संकष्टीचतुर्थीनिमित्त जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत राजुरेश्वराचे भाविकांनी मनोभावे प्रार्थना करून दर्शन घेतले. कडक उन्हाळ्याचे दिवस असताना देखील भाविकांनी पायी चालत दर्शनास येणे पसंद केले. यामध्ये महिलांची संख्या मोठी होती. शाळेला सुट्टी असल्या कारणाने शाळकरी मुलांनीही आपल्या कुटुंबियांसोबत दर्शनासाठी आल्याचे दिसून आले. सकाळ-संध्याकाळच्या वेळी भक्तांनी जास्त गर्दी केली होती. श्रीचरणी अर्पण करण्यासाठी नारळ, फुले आदींची मोठ्या प्रमाणात मागणी होत होती. भक्तांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून गणपती संस्थांच्या माध्यमातून पायदानी, मंडपची सोय करण्यात आली होती. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महिला-पुरुष सेवेकरींनी सेवेच्या माध्यमातून आपले योगदान दिले. अनुचित प्रकार घडू नये म्हणून हसनाबद पोलीस ठाण्याच्या स.पो.नि. वैशाली पवार यांनी मंदिर परिसरास प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. बंदोबस्तात वाढ करून जागोजागी पोलीस तैनात करण्यात आले होते. मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून भाविक श्रीचरणी नतमस्तक होऊन दर्शन घेत होते.

# वाडी येथे खरीप हंगाम पंधरवड्यानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका कृषी अधिकारी आर.जी.गुंडिले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये खरीप हंगाम विशेष पंधरवाडा मोहीम प्रशिक्षण कार्यक्रम वाडी गावात घेण्यात आला यावेळी आर.जी. गुंडिले यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की बि बि एफ वर पेरणी करणे, आडवी पेरणी करणे, कापूस लागवड तंत्रज्ञान, पेरणी करताना खताचा बेसल डोस पेरुन देणे, योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये तसेच खते व बियाणे घेताना विशेष काळजी घ्यावी पक्की पावती घेणे अनोळखी माणसाकडून बियाणे व खते घेऊ नये. तसेच शेतकऱ्यांच्या पोखरा व महाडीबीटी योजनेबद्दल समस्यांचे निराकरण केले, तसेच बैठक संपल्यानंतर त्यानंतर मौजे वाडी येथे कापूस पिकाची धुळपेरणी चालू असलेल्या शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून पेरणी बाबत योग्य ते आर.एन. साळुंके मॅडम कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषि अधिकारी आर. जी. गुंडीले, कृषि पर्यवेक्षक के.पी.महाजन, आर.एन. साळुंके कृषी सहाय्यक, याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अमित शहा यांच्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : पोतगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय नेते तथा



केन्द्रीय गृह मंत्री अमित शहा यांची नांदेड येथे 10 जूनला सायंकाळी 5 वाजता अबचलनगर मैदानावर विराट जाहीर सभा नांदेडचे खा. प्रतापराव. पाटील चिखलीकरांच्या नेतृत्वाखाली होणार असून नायगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य रविंद्र पोतगंटीवार यांनी केले आहे.

मागील 9 वर्षात राष्ट्रप्रथम या ध्येयाप्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या व पक्षाच्या ध्येय धोरणाच्या माध्यमातून कृषी, विज्ञान, संरक्षण, अंतराळ, शिक्षण, व्यापार, परराष्ट्र धोरण, वित्तीय व्यवस्थापन, देशांतर्गत वाहतूक सुधारणा, कायदेविषयक सुधारणा, रेल्वे व विमान वाहतूक, रोजगार, सौर ऊर्जा आदी क्षेत्रात उल्लेखनीय भरीव कामगिरी केली व करीत आहेत. मोदी सरकारला नऊ वर्ष पूर्ण झाल्या निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने महासंपर्क अभियान हे 30 मे ते 30 जून पर्यंत राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या 10 जून 2023 रोजी सायंकाळी 5 वाजता अबचलनगर नांदेड येथे होणाऱ्या विराट जाहीर सभेस उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखरजी बावनकुळे, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्रातील राज्या मंत्री, खासदार, आमदार उपस्थित राहून मार्गदर्शन व संबोधन करणार आहेत.
तरी या विराट सभेला नायगाव विधानसभा क्षेत्रातील सर्व भारतीय जनता पक्षाच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी व भाजप प्रेमी शेतकरी, व्यापारी, कामगार व सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य रविंद्र पोतगंटीवार यांनी केले आहे.



# वृक्षारोपणाची परवानगी न मिळाल्याने केला शासनाचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** गोदावरी मराठवाडा पा. वि. महामंडळांतर्गत २०१९-२०२० व २०२०-२०२१ वर्षात अस्तित्वातच नसलेल्या ठिकाणी वृक्षारोपन केल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. संबंधीत कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता हे ही बाब खाजगीत मान्य करतात पण संबंधीतांवर कारवाई करीत नाहीत. रउफ पटेल यांनी संघर्ष करून याचा पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे. शासन ज्या ठिकाणी वृक्षारोपन करते आहे ते ठिकाण दाखवून द्यावे आणि मलाही वृक्षारोपनाची परवानगी द्यावी ही मागणी त्यांनी शासनाकडे केली होती.

विभागीय आयुक्तांनी दखल घेउन जलसंपदाला सुचितही केले आहे. मात्र गोदावरी महामंडळाकडून उदासीन भूमिका घेतली गेली व आजच्या पर्यावरण दिनी कुठलीच कारवाई व सहकार्य केले नाही. रउफ पटेल यांनी वृक्षारोपनातील गोदावरी महामंडळाची भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालण्याची भूमिका व उदासीनता याचा निषेध करण्यासाठी चारूतांडा प्रकल्पावर बेशरमाची सांकेतीक लागवड करून निषेध नोंदविलेला आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या सभागृहाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आ.अतुलजी मोरेश्वर सावे सहकार कॅबिनेट मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या आमदार विकासनिधीतून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मैदान मेहर नगर अंतर्गत मल्हार चौक येथे पेवर ब्लॉक बसवणे 'विकास कामाचे भूमिपूजन कार्यक्रम पार पडले व सदर कार्यक्रमातच जय मल्हार मित्र मंडळाचे अध्यक्ष शिवाजी ढेपले ( महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना जिल्हा सदस्य )उपाध्यक्ष प्रमोद खाडे सचिव सखाराम भोजने कोषाध्यक्ष ईश्वर शिंदे यांनी प्रा.गोविंद केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर जागेतच मंडळाच्या मागणीनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधण्याची निवेदन मा.मंत्री महोदय अतुलजी सावे यांना दिले व त्यांनी ते सभागृहासाठी निधी एक दोन महिन्यात उपलब्ध करून देणार 'असे सांगितले. त्याप्रसंगी यळकोट यळकोट जय मल्हार, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो या जयघोषणांनी मल्हारमय वातावरण तयार झाले.सदर कार्यक्रमात नगर सेविका विमलताई केंद्रे व शिवाजी दांडगे, बाळकृष्ण शेवंते सर विवेक राठोड, मंगलमूर्ती शास्त्री, लक्ष्मण ढेपले, पिराजी गोरे, सुहास ठोसर , प्रमोद राजुरकर, कुलकर्णी बंधू, धीरज केंद्रे, सिद्धेश्वर काकडे, विजूभाऊ पवार, दामले भागवत, काळे , बकाल, गोरे, खेडकर, लोकरे काका व सर्व समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाची सूत्रसंचालन प्रा. गोविंद केंद्रे सर यांनी केले.



